आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२७ । मंगळवार १७ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



## अभिनेत्री अमिषा पटेलविरुद्ध अजामीन पात्र अटक वॉरंट

मनोरंजनसृष्टीत सध्या राजपाल यादवच्या चेक बाउन्स प्रकरणामुळे खळबळ उडाली. अशातच बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री अमिषा पटेल हिच्या अडचणीत वाढ झाली आहे. आर्थिक फसवणूकप्रकरणी अमिषा कायद्याच्या कचाट्यात सापडली. मुरादाबादच्या न्यायालयानं एका जुन्या फसवणूक प्रकरणात अभिनेत्रीविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. वारंवार समन्स बजावूनही अमिषा पटेल न्यायालयात गैरहजर होती. याच कारणास्तव न्यायालयानं कडक पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला.

## महत्त्वाचे..

### मुंबई पोलिसांकडून विदीप जाधवांच्या कुटुंबाला १.४० कोटींची मदत



मुंबई : आपल्या प्रिय व्यक्तीच्या निधनाची भरपाई कोणत्याही रकमेने होऊ शकत नाही, मात्र संकटकाळात मिळणारा आर्थिक आधार कुटुंबाला कोलमडण्यापासून वाचवू शकतो. याच भावनेतून मुंबई पोलीस यांनी आपल्या शहीद सहकाऱ्याच्या कुटुंबाला मदतीचा हात दिला.महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अंगरक्षक स्वर्गीय विदीप जाधव यांचा दुर्दैवी विमान अपघातात मृत्यू झाला होता.विदीप जाधव यांचे वेतन खाते ॲक्सिस बँकेमध्ये होते. त्यांच्या वेतन खात्याशी संलग्न असलेल्या विमा संरक्षणाअंतर्गत १.२१ कोटींचा धनादेश १३ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या कुटुंबाला सुपूर्द करण्यात आला. हा कार्यक्रम पोलीस आयुक्त कार्यालयात पार पडला. हा धनादेश मुंबई पोलीस आयुक्त देवन भारती, आयपीएस यांच्या हस्ते नामनिर्देशित कुटुंबीयांना प्रदान करण्यात आला. यावेळी ॲक्सिस बँकेचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात जाहीर होणार कृषी कर्जमाफी ?

## शेतकऱ्यांकडील थकीत कर्जांची माहिती शिंदे समितीकडे देण्याच्या बँकांना सूचना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य सरकार कर्जमाफीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. राज्यातील सर्व बँकांना थकीत शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकारकडून कृषी कर्जमाफी जाहीर होण्याची आशा आहे.

जून २०२५ पर्यंत थकीत कर्जदार शेतकऱ्यांची माहिती नाशिक जिल्हा बँकेकडून देखील घेतली जात आहे. ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून इतर शेतकऱ्यांची माहिती मिळवण्याची प्रक्रिया जिल्हा बँकेकडून सुरू आहे. याबाबत नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी माहिती दिली आहे.

राज्य शासनाच्या मदतीसाठी एक



समिती गठीत केली आहे. या समितीद्वारे राज्यातील जे थकबाकीदार शेतकरी आहेत. त्या शेतकऱ्यांची ३० जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या तारखेदरम्यानची माहिती मागवण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील सेवा सरकारी सोसायटी, सचिव, बँकेचे तपास अधिकारी, बँकेचे शाखाअधिकारी यांच्यामार्फत आम्ही थकीत कर्जदार शेतकऱ्यांची माहिती गोळा करत आहोत. यामध्ये सहनिबंधक, निबंधक सरकारचे अधिकारी यांचेही सहकार्य मिळतंय, अशी माहिती अरविंद शिंदे यांनी दिली.

### २३ फेब्रुवारीपासून राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन

**महाराष्ट्राच्या राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, हे अधिवेशन २५ मार्चपर्यंत चालणार आहे. तसेच ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अर्थसंकल्प सादर करणार आहेत. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. त्यानुसार राज्य विधिमंडळाच्या मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार, २३ फेब्रुवारी ते बुधवार, २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. यादरम्यान, ६ मार्च रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. तसेच, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णय घेण्यात आला.**

# अजितदादांच्या निधनानंतर ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा!

## सर्वस्तरीय टीकेनंतर मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** उपमुख्यमंत्री, कामाचा माणूस, आपले दादा अशी ओळख असलेल्या अजित पवारांचं २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झालं. संपूर्ण महाराष्ट्र या घटनेमुळे शोकाकुल झाला.

दरम्यान अजित पवारांच्या निधनाच्या दिवशीच एक लाजिरवाणी घटना मंत्रालयात घडली. अजितदादांनी थांबवून ठेवलेल्या काही फाइल्सवर दुपारी ४ वाजता सह्या करण्यात आल्या आणि ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या घटनेची माहिती समोर येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. या प्रमाणपत्रांना स्थगिती देण्यात आल्याचा निर्णय घेतला आहे. २८ जानेवारीला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी अपघात झाला. विमानाचं क्रॅश लँडिंग झालं. विमानात अजित पवारांसह उपस्थित असलेल्या सगळ्यांचा या अपघातात मृत्यू झाला. या घटनेला काही तास उलटत नाहीत तोच मंत्रालयात वेगाने चक्रं फिरली आणि २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्याक **(पान ४ वर)**





### सर्वच वंगाळ झालंय...

**सर्वच वंगाळ झालंय, माणसाची काही किंमत आहे की नाही? थोड्या फार तर भावना, संवेदना असायला हव्यात की नाही? असा प्रश्न विचारत आ. रोहित पवारांनी फाइल्स मंजुरी प्रकरणावर टीका केली आहे.**

# फिर्यादी असूनही मलाच मारहाण..!

## ४०० कोटींच्या कंटेनर चोरी प्रकरणातील तक्रारदाराचे पोलिसांवर गंभीर आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन नाशिक पोलिसांनी डखढ स्थापन केली. या तपासात कॉल डिटेल्स, लोकेशन डेटा, सीसीटीव्ही फुटेज आणि कथित घटनाक्रमाचा सखोल अभ्यास करण्यात आला. तपासादरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीत आणि तांत्रिक पुराव्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती आढळून आल्या. अखेर, अशी कोणतीही कंटेनर लूट किंवा अपहरण प्रत्यक्षात घडलेच नसल्याचे तपासात समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली.**

**नाशिक :** संपूर्ण राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील ४०० कोटी रुपयांच्या कथित कंटेनर चोरी आणि अपहरण प्रकरणात आता नाट्यमय वळण आले आहे. अपहरणाचा गुन्हा दाखल करणारे फिर्यादी संदीप पाटील यांनीच आता पोलिसांवर गंभीर आरोपांची मालिका केली असून, न्याय मागण्यासाठी थेट मुंबई उच्च न्यायालय गाठण्याची तयारी केली आहे. संदीप पाटील यांनी केलेल्या आरोपांनुसार, या प्रकरणात ते फिर्यादी असतानाही पोलिसांनी त्यांनाच मारहाण केली, शिवीगाळ केली आणि बेकायदेशीररित्या डांबून ठेवले. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणासाठी नेमण्यात आलेल्या एसआयटीचे प्रमुख आदित्य मिरखेलकर यांनीच आपल्याला मारहाण केल्याचा गंभीर आरोप पाटील यांनी केला आहे. तसेच, 'मुख्य आरोपींना पाठीशी घालत मला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न होत आहे,' असा आरोप करत त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या प्रकरणाची सुरुवात कर्नाटकातील चोरला घाट परिसरात २ हजार रुपयांच्या जुन्या नोटांनी भरलेला, तब्बल ४०० कोटी रुपये किमतीचा कंटेनर चोरीला गेल्याच्या दाव्यापासून झाली होती. या कथित लुटीच्या पार्श्वभूमीवर, मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकासह इतरांनी आपले अपहरण केल्याचा आरोप करत संदीप पाटील यांनी नाशिक जिल्ह्यातील घोटी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. प्रचंड रकमेचा उल्लेख असल्याने हे प्रकरण राज्यभर चर्चेचा विषय ठरले. या प्रकरणात पोलिसांनी किशोर सावला, विराट गांधी, जयेश कदम, विशाल नायडू, **(पान ४ वर)**

# नगरमध्ये एटीएसचे छापे

## १२ ठिकाणी कारवाई, तलवारी जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील मुकुंदनगर, सावेडी उपनगरातील तपोवन रस्ता परिसर व कोठला भागात रविवारी (१५ फेब्रुवारी) पहाटेपासून महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) गुप्त छापेमारी मोहीम राबवून १२ घरांची झडती घेतली. सुमारे १०० ते १२५ अधिकारी-कर्मचार्यांच्या पथकाने एकाच वेळी विविध ठिकाणी कारवाई करत लॅपटॉप, मोबाईलमधील डिजिटल डेटा, संशयास्पद पुस्तके व कागदपत्रे ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ही कारवाई अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली होती. पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास विविध वाहनांतून पथक शहरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांना केवळ बंदोबस्तासाठी कळविण्यात आले होते; तपासाच्या स्वरूपाची माहिती त्यांना देण्यात आली नव्हती. त्यामुळे कारवाईदरम्यान संबंधित परिसरात तणावपूर्ण शांतता आणि उत्सुकता निर्माण झाली होती. पहाटे ३ पासून सुरू झालेली तपासणी दुपारी तीनपर्यंत सुरू होती. मुकुंदनगरमधील १०, तपोवन रस्ता परिसरातील एक आणि कोठला भागातील एका घरात सखोल चौकशी करण्यात आली. डिजिटल उपकरणांमधील डेटा जप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कोणालाही ताब्यात घेण्यात आले नसले तरी काही

### घरात आढळले शस्त्र; दोन गुन्हे दाखल

**मुकुंदनगर परिसरातील दोन घरांवर कारवाईदरम्यान मोठा शस्त्रसाठा आढळून आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अमीर हमजा जफर शेख, असद जुबेर सय्यद यांच्या घरातून दोन तलवारी, एक गुप्ती, एक फायटर, दोन चाकू, एक कोयता, एक एअरगन व ९९ छरे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील अमीर शेखला ताब्यात घेतले आहे. तर, अयान अन्वर शेख (वय २५) याच्या घरात सहा कोयते मिळून आले. या प्रकरणी भिंगार पोलिसात भारतीय हत्यार अधिनियमांतर्गत दोन स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले आहे. पुढील तपास सुरू असून शस्त्रसाठ्याचा संभाव्य वापर व त्यामागील हेतू याचा शोध घेतला जात आहे.**



तरूणांकडे कसून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. कारवाईदरम्यान पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, स्वतः कार्यालयात हजर झाले होते. त्यांनी आवश्यक त्या ठिकाणी बंदोबस्त देण्याच्या सूचना केल्या.

शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच भिंगार कॅम्पचे सहायक निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी संबंधित भागात उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले. तथापि, एटीएसच्या अंतर्गत तपासात स्थानिक पोलिसांना सहभागी करून घेण्यात आले नव्हते. त्यांच्या भूमिकेपुरते बंदोबस्त आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम मर्यादित ठेवण्यात आले.सूत्रांच्या माहितीनुसार, प्राथमिक चौकशीत काही धागेदोरे हाती लागले असून त्यावर आधारित पुढील टप्प्यात व्यापक कारवाई होण्याची शयता नाकारता येत नाही. अहिल्यानगरमध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर एटीएसची कारवाई झाल्याने शहरात दिवसभर चर्चांना उधाण आले होते.

## संस्थाचालक अन् सहकारी शिक्षकाकडून त्रास...

# प्रभारी मुख्याध्यापकाची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**धाराशिव :** धाराशिवचा लोहारा तालुक्यातील महात्मा गांधी विद्यालयातील प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या तानाजी विठ्ठलराव जाधव यांनी गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली आहे. काल (१५ फेब्रुवारी) संध्याकाळी ७:३० च्या सुमारास हि आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणामुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संस्थाचालक आणि सहकारी शिक्षकाकडून त्रास होत असल्याचा उल्लेख सुसाईड नोटमध्ये करण्यात आला आहे.





जाधव यांनी आत्महत्येपूर्वी सुसाईड नोट लिहून ठेवली असून त्यामध्ये संस्थाचालक व सहकाऱ्यांच्या होत असलेल्या जाचाला कंटाळून आपण आत्महत्या करत असल्याचे नमूद केले आहे. संबंधित सुसाईड नोट पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह पुढील तपासासाठी पाठवला आहे. मात्र या या प्रकरणामुळे धाराशिवच्या शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

पिंक सिटी रोडवरील अस्वानी गॅलक्सी सोसायटीमध्ये खेळत असताना सुरक्षेअभावी एका ३ **(पान ४ वर)**

# परदेशातील मुलांनाही मिळणार मराठीचे ऑनलाईन शिक्षण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

### मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांचे आश्वासन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समितीच्या बैठकीत महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग-१६०ए (एनएच-१६०ए) च्या घोटी–त्र्यंबक (मोखाडा)–जव्हार–मानोर–पालघर या एकूण १५४.६३५ किलोमीटर लांबीच्या मार्गाच्या पुनर्वसन व चौपदरीकरणास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे ३,३२०.३८ कोटी रुपयांचा भांडवली खर्च अपेक्षित असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीमधील दळणवळण अधिक वेगवान व सुरक्षित होणार आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांना मोठा दिलासा मिळणार असून, पर्यटन, व्यापार आणि औद्योगिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. घोटी, त्र्यंबक, जव्हार, मानोर व पालघर या भागांना जोडणारा हा मार्ग सुधारित झाल्यास प्रवासाचा वेळ कमी होऊन अपघातांचे प्रमाण घटण्यास मदत होणार आहे. तसेच शेतमाल वाहतूक, रोजगाराच्या संधी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.हा प्रकल्प 'पीएम गतीशक्ती' तत्त्वावर आधारित असून, याद्वारे महाराष्ट्रातील ६ आर्थिक नोड्स, ७ सामाजिक नोड्स आणि ८ लॉजिस्टिक नोड्स जोडले जाणार आहेत. यात प्रामुख्याने तारापूर आणि बोईसर येथील सेझ (डएन), मोखाडा औद्योगिक उद्यान आणि वाडा येथील औद्योगिक वसाहतींचा समावेश आहे. तसेच त्र्यंबकेश्वर, जव्हार राजवाडा, वैतरणा नदी आणि अर्नाळा किल्ला यासारख्या पर्यटन स्थळांनाही या महामार्गाचा मोठा लाभ मिळेल. पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील पायाभूत सुविधा सुधारल्यामुळे या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ आणि वाहनांच्या देखभालीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे ४४ लाखांहून अधिक व्यक्ती-दिवसांचा रोजगार निर्माण होणार आहे. हा महामार्ग पुढे दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे (NE-4) आणि वाढवण बंदरासारख्या महत्त्वाच्या केंद्रांशी जोडला जाणार असल्याने राज्याच्या लॉजिस्टिक कामगिरीत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.



### अजितदादांनी २६५ कोटी रुपये दिले

**मराठी भाषा विभागाला वीत्त मंत्री अजितदादांनी २६५ कोटी रुपये दिले. त्यामधून सगळे कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सुरू झालेले आहेत. बाल साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन असेल, युवा साहित्य संमेलन असेल, दिल्लीचे आमचे मराठी साहित्य संमेलन असेल, परवा झालेलं साताऱ्याचं मराठी साहित्य संमेलन असेल. आज मराठी भाषेचं दालन महाराष्ट्राच्या कुठल्याही काना कोपऱ्यामध्ये उभारण्याची ताकद आज मराठी भाषा विभागाची झालेली आहे. काश्मीरला देखील मराठी पुस्तकांचं गाव करण्याचा निर्णय माझ्या मराठी भाषा विभागाने घेतलेल्या आहे.**
**– उदय सामंत, मराठी भाषा मंत्री**

# संपादकीय

## मंत्रालयः भ्रष्टाचाराचे केंद्र की लोककल्याणाचे प्रतीक?

महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासनमंत्र्यांच्या लिपिकाला थेट मंत्रालयातच लाच घेताना पकडले गेल्याने एका छोट्या घटनेने राज्याच्या प्रशासनातील भ्रष्टाचाराचे खरे चित्र उघड केले आहे. ही केवळ एक घटना नाही, तर मंत्रालयाच्या पवित्र वास्तूचे वस्त्रहरण आहे. ज्या इमारतीला राज्याच्या विकासाचे, धोरणनिर्मितीचे आणि जनकल्याणाचे प्रतीक मानले जाते, त्या इमारतीतच लाचखोरीचे प्रकरण उघड होणे हे दुर्दैवी आहे. सामान्य नागरिकांच्या मनात मंत्रालय ऐकले की आदरापेक्षा भीती आणि असहायता निर्माण होते, हे वास्तव आता नाकारता येत नाही. लाचखोरी आणि भ्रष्टाचाराचा उगम थेट मंत्रालयातून होतो, असा समज आजवर होता; या घटनेने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

मंत्रालय हे महाराष्ट्राच्या प्रशासनाचे मुख्य केंद्र आहे. येथून राज्याचे धोरणे आकार घेतात, विकासकामे मंजूर होतात आणि जनतेच्या समस्या सोडवल्या जातात. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, एका साध्या फाईलला गती देण्यासाठी किंवा एका सहीसाठीही पैशांची उघड मागणी होत असल्याच्या तक्रारी सातत्याने येतात. पुढे त्यावर काहीच कारवाई न झाल्याने लोक उपरोधिकपणे म्हणतात, मंत्रालय नव्हे, भ्रष्टालय! ही केवळ एका दिवसाची रागाची भावना नाही, तर प्रशासनातील खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराविरोधातील तीव्र प्रतिक्रिया आहे. लाचखोरी आता अपवाद राहिलेली नाही; उलट, लाचखोरीचे प्रकरण उघड होणे हाच मोठा अपवाद ठरू लागला आहे. ही परिस्थिती कोणत्याही सुसंस्कृत लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे.

भ्रष्टाचाराची ही साखळी केवळ मंत्रालयापुरती मर्यादित नाही. ती ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंत अखंड चालू आहे. यातील सर्वात मोठे केंद्र म्हणजे विविध स्तरांवर दिला जाणारा ‘विकासनिधी’. नगरसेवक निधीपासून आमदार निधीपर्यंत या निधीचा वापर जनकल्याणासाठी नव्हे, तर लुटीचा ‘सरकारमान्य अधिकृत परवाना’ म्हणून होत असल्याची शंका घेतली जाते. चार बाकडे आणि एक साधे शेड उभारण्यासाठी वीस-पंचवीस लाखांचा खर्च दाखवला जातो. ही केवळ अनियमितता नाही, तर जनतेच्या पैशांची उघड लूट आहे. किरकोळ कामांसाठीही लाखो रुपयांची बिले सादर केली जातात. या निधीच्या वापरावर कोणतीही प्रभावी नजर नाही. परिणामी, विकासकामे अपुरी राहतात आणि जनतेचा विश्वास उडतो.लाचखोरी आणि भ्रष्टाचारावर आजवर गिनीज बुकात नोंद होईल एवढ्या प्रमाणात चर्चा झाली आहे. परंतु चर्चेला आता विराम देऊन ठोस कृती करण्याची वेळ आली आहे. फक्त कायदे करून चालणार नाही. प्रशासकीय पातळीवर धाडसी सुधारणा करणे गरजेचे आहे. यासाठी पाच मुख्य उपाय सुचवता येतात, जे व्यवस्थेत पारदर्शकता आणू शकतात.पहिला उपाय म्हणजे तंत्रज्ञानाधारित पारदर्शक बदली धोरण. भ्रष्टाचाराचे मुख्य मूळ ‘मलईदार पोस्टिंग’मध्ये आहे. मोक्याच्या पदांसाठी अधिकारी कोट्यवधी रुपये मोजतात आणि नंतर तो पैसा वसूल करण्यासाठी भ्रष्ट मार्ग अवलंबतात. ग्रामसेवकापासून मुख्य सचिवांपर्यंत सर्वांच्या बदल्या पूर्णपणे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणालीद्वारे होणे आवश्यक आहे. दर तीन वर्षांनी होणारी बदली मानवी हस्तक्षेपाशिवाय झाल्यास प्रामाणिक अधिकाऱ्यांना बळ मिळेल आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर अंकुश बसेल. यामुळे ‘पैसे देऊन पोस्टिंग’ची प्रथा संपुष्टात येईल.दुसरा उपाय म्हणजे ई-गव्हर्नन्स आणि रिअल-टाइम फाईल ट्रॅकिंग. प्रत्येक सरकारी कामाचे १०० टक्के डिजिटलायझेशन अनिवार्य करा. प्रत्येक फाईल सध्या कोणत्या टेबलावर आहे, तिथे किती दिवस थांबली आहे, याची माहिती सामान्य नागरिकांना ऑनलाइन उपलब्ध करा. यामुळे ‘टेबलखालचे व्यवहार’ पूर्णपणे थांबतील. नागरिकांना स्वतःच्या कामाची प्रगती घरबसल्या पाहता येईल आणि अधिकाऱ्यांना जबाबदार धरता येईल.तिसरा उपाय म्हणजे ‘सेवा हमी कायद्या’ची कठोर अंमलबजावणी. ठराविक वेळेत काम न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद या कायद्यात आहे. परंतु ती कागदावरच राहते. कामासाठी मुद्दाम विलंब लावणे हे भ्रष्टाचाराचे पहिले पाऊल असते. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास विलंब कमी होईल आणि पारदर्शकता वाढेल. प्रत्येक विभागात एक स्वतंत्र निगरानी कक्ष स्थापन करून याची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

चौथा उपाय म्हणजे विकासनिधीचे त्रयस्थ अंकेक्षण आणि सार्वजनिक प्रदर्शन. प्रत्येक विकासकामावर खर्च होणाऱ्या पैशाचे थर्ड पार्टी ऑडिट बंधनकारक करा. कोणत्या कामासाठी किती निधी मंजूर झाला आणि प्रत्यक्ष किती खर्च झाला, याचे फलक कामाच्या ठिकाणी आणि सरकारी पोर्टलवर जाहीरपणे लावा. यामुळे निधीच्या लुटीला चाप बसेल. जनतेला स्वतःच तपासता येईल की त्यांच्या पैशाचा योग्य वापर झाला का.पाचवा उपाय म्हणजे एसीबी (अँटी करप्शन ब्यूरो) चे सक्षमीकरण आणि व्हिसलब्लोअर संरक्षण. एसीबीला राजकीय दबावापासून पूर्ण मुक्त करून स्वायत्तता द्या. भ्रष्टाचाराची माहिती देणाऱ्या नागरिक किंवा प्रामाणिक अधिकाऱ्याला विशेष संरक्षण द्या. माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवून तक्रारीवर तात्काळ कारवाई करण्याची यंत्रणा उभी करा. यामुळे अधिकाधिक लोक भ्रष्टाचाराविरोधात पुढे येतील.याशिवाय एक महत्त्वाचा मुद्दा आहे. लाचखोरीत पकडल्या जाणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्याची तपासणी करण्यासाठी त्या विभागाच्या वरिष्ठांची परवानगी घेण्याचा नियम. हा नियम म्हणजे दरोडेखोराला पकडल्यानंतर दरोडेखोरच चोरीच्या प्रमुखाची परवानगी मागणे असा आहे. हा नियम तात्काळ रद्द करावा. लाचखोरीचे उच्चाटन करण्याच्या घोषणा करणारे सरकार यात धाडस दाखवत नाही, हे खेदजनक आहे. आज भारत चंद्रावर पोहोचण्याची तंत्रज्ञान क्षमता बाळगतो. मग एक पारदर्शक, मानवी हस्तक्षेपविरहित प्रशासन उभारणे अशक्य का? ही समस्या तंत्रज्ञानाची नाही, तर प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची आहे. कायदे ढिगाऱ्याने असूनही धाक नसल्यामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते. मंत्रालयाची प्रतिष्ठा जपण्यासाठी आता केवळ घोषणांची नाही, तर ठोस कृतीची वेळ आली आहे. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक नुकसान नाही, तर लोकशाहीची पायाभूत मूल्ये उद्ध्वस्त करणारा आहे. जनतेचा विश्वास उडाल्यास विकास शक्य नाही. लोकप्रतिनिधी आणि सरकारवर जनतेचा दबाव निर्माण करून ही साखळी तोडली पाहिजे. प्रामाणिक अधिकाऱ्यांना प्रोत्साहन द्या, भ्रष्टांना कठोर शिक्षा द्या. तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि जबाबदारी यांच्या त्रिसूत्रीने मंत्रालयाला पुन्हा ‘लोककल्याणाचे प्रतीक’ बनवता येईल.ही सुधारणा केवळ महाराष्ट्रासाठी नाही, तर संपूर्ण देशासाठी आदर्श ठरेल. जनता आता चर्चा ऐकून थकली आहे. ती ठोस कृती पाहू इच्छिते. सरकारला हे समजून घेणे गरजेचे आहे की, भ्रष्टाचाराविरोधात धाडस न केल्यास इतिहास त्यांना कधीही माफ करणार नाही. मंत्रालय पुन्हा एकदा आदराने उचलले जावे, भीतीने नव्हे. यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि तात्काळ कृती हवी. जनता पाहत आहे, वाट पाहत आहे.

# शिर्डीत दोन महिला ठगांकडून साई भक्तांस १२ हजारांना फटका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**अशोक दुशिंग ।**

**शिर्डी :** शिर्डीत या पुर्वी हार, प्रसाद किंवा हॉटेलच्या नावाखाली फसवणूक झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या होत्या. मात्र डोक्यावरील टक्कलवर केस येण्यासाठी आयुर्वेदिक औषधाच्या नावाखाली एका साईभक्ताची १२ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा अफलातून प्रकार उघडकीस आला आहे.

शिर्डीत साई भाविकांची लूट थांबायचे नाव घेत नसून साई महा परिक्रमेत सहभागी झालेल्या साई भक्तांस डोक्यावरील टक्कलवर केस येतील अशी फसवणूक करत, आयुर्वेदिक दुकानदारासह महिला एजंटांनी सुमारे १२ हजार रुपयांना गंडा घातला. त्यामुळे शिर्डीत पुन्हा फसवणुकीचा गुन्हा समोर आला.

या प्रकरणी शिर्डी पोलिसांनी चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आंध्र प्रदेशातील अनंतपुरम जिल्ह्यातील ताडीपत्र येथील साईभक्त गिरीशकुमार थंगपूर सत्यानारायण हे १२ फेब्रुवारी २०२६ रोजी शिर्डीत दर्शनासाठी आले होते. साई मंदिराजवळ फिरत असताना त्यांना एक महिला भेटली. तिने त्या साईभक्ताला नाही लावत तुमच्या डोक्यावर केस येण्यासाठी आमच्याकडे खात्रीशीर आयुर्वेदिक औषध असून ते तुम्ही खरेदी केल्यास नक्की डोक्यावर केस येतील असा बनाव करत ताजीम खान चौकातील 'साईकृपा आयुर्वेदिक' दुकानात नेले. गिरीशकुमार यांस तेथे नेल्यानंतर त्यांस औषधाच्या तीन पुड्या देण्यात आल्या. या औषधापोटी १०,००० रुपये आणि एजंटचे १,४०० रुपये असे एकूण ११,४०० रुपये त्यांच्याकडून उकळण्यात आले. त्यानंतर ही औषधे बोगस असून आपली फसवणूक झाल्याचे गिरीशकुमार यांच्या लक्षात आले. त्यांनी १५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिर्डी पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, पोलिसांनी मनोज गोविंद शिके, मोना गोविंद शिके, राणी रतिलाल पखाले (सर्व रा. शिर्डी) आणि एजंट राणी कनवार सडमोके (रा. श्रीरामपूर) या चार आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता ३१८ (४) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. शिर्डीत आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली अनेक दिवसांपासून अनेक दुकाने थाटली असून फसवणूकीचा हा प्रकार राजरोस सुरू आहे . हा व्यवसाय करणाऱ्या अनेक टोळया शिर्डीत सक्रीय सदर गुन्हेगारांनी शिंगणापूर, त्र्यंबकेश्वर, शिर्डी अशा महत्वाच्या धार्मिक स्थळांना टार्गेट केले आहे . दरम्यान शिर्डीतून हा फसवणूकी चा धंदा त्वरीत हद्दपार करावा अशी मागणी होत आहे.

**एक मोना दोन राणी**

आयुर्वेदिक औषधे विकण्याचा बहाणा करून परप्रांतातून आलेल्या साईभक्ताना लक्ष करून आमचेकडे अनेक रोगांवर रामबाण इलाज असल्याचे भासवून ग्राहकांची फसवणूक करण्यात मोना शिके, राणी पाखले व राणी सडमोके या सराईत असून त्यांनी अजून कोणत्या भागात फसवणूक केली आहे. याचा शोध शिर्डी पोलीस घेत आहे.




# कार्डीयाक रुग्णवाहिकाचे लोकार्पण



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यात आरोग्यसेवेसाठी महत्त्वाची ठरणारी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देत . रुग्णवाहिका मालक गणेश वराळे व रवींद्र देवगिरे यांच्या पुढाकारातून राहुरी तालुक्याला अत्याधुनिक कार्डीयाक रुग्णवाहिका मिळाली असून त्यामुळे हृदयविकार व आपत्कालीन रुग्णांना वेळीच उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नवीन कार्डीयाक रुग्णवाहिकेचे लोकार्पण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी तालुक्यातील सर्व रुग्णवाहिका चालक, मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सह जिल्हा निबंधक वर्ग एक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी तुकाराम पालवे, सह जिल्हा निबंधक वर्ग एक माजी अधिकारी शरदराव झोटिंग यांच्या विशेष उपस्थितीने कार्यक्रमाला विशेषता लाभली.

गणेश वराळे व रवींद्र देवगिरे यांनी तालुक्यातील नागरिकांना तातडीच्या आरोग्यसेवा अधिक सक्षमपणे पुरवण्यासाठी ही रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. अत्याधुनिक लाइफ सपोर्ट सिस्टम, कार्डियाक मॉनिटरिंग उपकरणे, व्हेंटिलेटर यांसारखी उपचारासाठी आवश्यक सर्व साधने या रुग्णवाहिकेत बसविण्यात आली आहेत.

यावेळी राहुरी तालुक्यातील आरोग्य सेवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेला हा उपक्रम समाजहिताचा आदर्श नमुना असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

# श्री रामेश्वर बाबा अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** संगमनेर तालुक्यातील चणेगांव येथे सालाबाद प्रमाणे महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताह काळात नैमित्तीक काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, हरिकिर्तन, भजन आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताह काळात अध्यात्मिक कार्यक्रमांबरोबरचं प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी यांचे वतीने मोफत भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मार्ग दावुनी गेले आधी श्र दयानिधी संत ते श्रश्र तेणेची पंथे चालु जाता श्र न पडे गुंथा कोठे काही श्रश्र या उक्ती प्रमाणे संतानी दाखविलेल्या मार्गाने मार्गक्रमण केले असता जीवनातील अडथळे दुर होतात व जीवन सुखमय होते. याचीच अनुभुती या सप्ताह काळात आल्याचे पहावयास मिळाले.

या अखंड हरिनाम सप्ताह काळात लोकउपयोगी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रामुख्याने सात दिवस दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत नामवंत किर्तनकारांचे किर्तनाचे आयोजन किर्तनसेवा संपल्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासासाठी चणेगांवसह पंचक्रोशीतील भाविकांनी सप्ताह काळात किर्तनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी गावातुन ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकीनंत युवा किर्तनकार ह.भ.प.सचिन महाराज ढोले, छत्रपती संभाजीनगर यांच्या सुश्राव्य वानितुन काल्याची किर्तन सेवा पार पडली.



# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये स्व. आण्णासाहेब पटारे यांना अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अशोक सहकारी साखर कारखान्याचे मा. चेअरमन स्व. आण्णासाहेब पटारे यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दिलीप कोकणे तर अध्यक्षस्थानी टाकळीभान सोसायटीचे चेअरमन व स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य मंजाबापू थोरात उपस्थित होते. तर व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, टाकळीभान ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. अर्चनाताई रणनवरे, स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य राहूल पटारे, तंटामुक्तीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे, काकासाहेब रणनवरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार जाधव, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एम. शिंदे, पर्यवेक्षक एस.एस.जरे आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील ,त्यागमूर्ती लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, स्व .आण्णासाहेब पटारे पाटील आणि संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. दिलीप कोकणे म्हणाले की,टाकळीभानच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये स्व. आण्णासाहेब पटारे पाटील यांचे मोलाचे योगदान असून समाजातील सर्वसामान्य, गोरगरीब लोकांना त्यांनी नेहमी मदत केली. आपल्या ओघवत्या भाषेत प्रा. दिलीप कोकणे यांनी स्व. आण्णासाहेब पटारे पाटील यांचा जीवनपट विद्यार्थ्यांना सांगितला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मंजाबापू थोरात यांनी स्व. आण्णासाहेब पटारे यांच्या जीवनावरील विविध प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा .सुयोग जाधव, सूत्रसंचालन संदिप जावळे यांनी तर आभार शुभम पवार यांनी व्यक्त केले.

# रब्बीसाठी दोन आवर्तनाचे तात्काळ नियोजन करा : अनिल औताडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** भंडारदरा सिंचन प्रणालीच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर ऊस, रब्बीचे कांदा, गहू ,मका आदि सर्वच पिकांना शेवटच्या पाण्याची गरज आहे.

त्यामुळे पिकांच्या सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर विहिरी बोअरचा उपसा सिंचनासाठी होत असताना पाणी पातळी खालावली आहे. साहजिकच जलसंपदा विभागाने रब्बी दोन साठी दुसरे आवर्तन २०-२१ फेब्रुवारीला पिण्याच्या आवर्तन सोबतच सुरू करणे गरजेचे आहे. तसेच आवर्तन कार्यकाळामध्ये शेतकऱ्यांकडून नमुना नंबर ७ चे पाणी अर्ज कालवा निरीक्षकांनी भरून घेणे साठी विभागाने सूचना कराव्या. जलसंपदा विभागाने थकबाकी अभावी कुठल्याही शेतकऱ्यांचे पाणी अर्ज नाकारू नये. यावर्षी खरीपामध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे भंडारदरा सिंचन प्रणाली कार्यक्षेत्रातील शेतकरीही शेती पिकांच्या नुकसानीमुळे बाधित झालेला आहे.श्रीरामपूर तालुक्यातील कॅनॉलच्या चाऱ्यांच्या परिसरातील पाणी पातळी खालावली आहे. मध्यंतरी शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी दोन दोन तीन तीन दिवस पिण्याचे आवर्तने घेतल्यामुळे कॅनॉलच्या परिसरातील पाण्याची परिस्थिती पंधरा-वीस दिवस पुढे ढकलण्यासारखी असली तरी कॅनॉल पासून अंतरावर असलेल्या भागांमध्ये पाणी पातळी खालवली आहे. आज रोजी धरणांमध्ये ९८ टक्के पाणीसाठा असून पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून तात्काळ आवर्तन सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत असल्याचे जिल्हाध्यक्ष अनीलराव औताडे यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# शेतकरी संघटनेच्या जिल्हा प्रभारी व प्रवक्तेपदी प्रा. कार्लस साठे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** महाराष्ट्र राज्याचे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील व उपाध्यक्ष ॲड अजित काळे यांचे सक्षम नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा प्रभारी व प्रवक्तेपदी अशोक कारखान्याचे माजी संचालक प्रा कार्लस साठे सर यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे त्यांची सामाजिक बांधिलकी व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्न संबंधी असणारी जाणीव तळमळ व समर्पित भावनेने काम करण्याची इच्छा याची दखल घेऊन त्यांची नियुक्ती केलेली आहे शेतीमालाला रास्त भाव मिळवून देणे, दूध दरवाढ, शेतकऱ्यांच्या विषयी विविध प्रश्न सोडवणे इत्यादी कामा संदर्भात शेतकऱ्यांची एकजूट घडवून आणून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्नशील राहणे, समृद्ध व सक्षम स्वयंपूर्ण भारत देश घडविण्यासाठी शेतकरी संघटनेने पुकारलेले न्यायिक आंदोलने यशस्वी करणे आदी कामासंदर्भात सक्रिय राहणार असल्याचे साठे यांनी सांगितले. या निवडीबद्दल रघुनाथ पाटील, ॲड. अजित काळे, जिल्हाध्यक्ष अनिल औताडे ,उपाध्यक्ष हरिआप्पा तूवर श्रीरामपूर तालुका अध्यक्ष युवराज जगताप, नेवासा तालुकाध्यक्ष नरेंद्र काळे, नेवासा तालुका युवाध्यक्ष रोहित कुलकर्णी ,टाकळीभान येथील राजेंद्र कोकणे मित्र मंडळ, बेलपिंपळगाव जिल्हा परिषद गटाचे उमेदवार बंडोपंत चौगुले, शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते वसंतराव शेरकर, खंडेराव सरोदे, भास्कर तुवर, बाळासाहेब शिरसाठ, भाऊसाहेब गव्हाणे, सुजित बोडखे, शरद आसने ,बाबासाहेब रोटे ,मुमताज सय्यद, भाऊराव तऱ्हाळ, नानासाहेब गारोळे, संतोष डिके, प्रभाकर पटारे, किरण लंघे ,बाबासाहेब नागवडे ,दादासाहेब नाबदे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांचा निवडीबद्दल शेतकरी संघटनेच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला.



# माळवाडगाव शाळेत इंटरॅक्टिव्ह बोर्डचे लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डिजिटल शिक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून शाळेला अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह इंटरनेट बोर्ड प्रदान करण्यात आला. या डिजिटल बोर्डचा लोकार्पण सोहळा शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने उत्साहात पार पड

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, उपाध्यक्ष तथा भाजपाचे सोशल मीडिया सेल तालुका संयोजक पत्रकार संदीप आसने, ललिता उमाप, सुदाम आसने, सुरभी दांगट, सारिका आसने, मुख्याध्यापक देवदास मुंतोडे, मल्हारी ठोकळ, बहिरु धोंगडे, श्रीकृष्ण शेळके, संगीता जाधव, वंदना गवळी, रंजनाताई बोर्डे, संगीता उंडे यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना संदीप आसने यांनी सांगितले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण योगदान राहिले आहे. यापूर्वीही त्यांच्या प्रयत्नातून शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे, संगणक संच उपलब्ध झाले असून, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली केंद्रस्तरीय प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. आता इंटरॅक्टिव्ह बोर्डमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ होणार आहे. शाळेला डिजिटल बनवण्याच्या या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मल्हारी ठोकळ यांनी केले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण घेण्याची नवी संधी उपलब्ध झाली असून, पालक व ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.




# सोनई येथील ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयात महाशिवरात्र उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त सोनई येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, यांच्या वतीने विशेष आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सन्माननीय माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी उपस्थित राहून सर्व भाऊ-बहिणींना शिवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांनी अध्यात्मिक जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले.तसेच विद्यालयाच्या संचालिका आदरणीय उषा बहनजी गेली अनेक वर्षे करत असलेल्या व्यसनमुक्ती जनजागृती कार्याचे कौतुक गडाख यांनी केले. आजच्या तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या मोबाईलच्या व्यसनाबाबतही त्यांनी चिंता व्यक्त करत, आत्मसंयम व सकारात्मक विचारसरणीची गरज असल्याचे सांगितले. याचबरोबर राजस्थान येथील माउंट आबू येथे असलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्यालयाला भेट देण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका आदरणीय उषा दीदी यांनी महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व सांगितले.






वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# संगमनेरात शिवसेना महायुतीकडून काँग्रेस प्रदेशाध्यक्षाचा निषेध

## छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते बसस्थानक रॅली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर टिपू सुलतानची तुलना केल्यामुळे संगमनेर बसस्थानक परिसरात सोमवारी (दि. १६) आमदार अमोल खताळ आणि शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सपकाळ यांची प्रतिमा पायदळी तुडवत जाहीर निषेध केला. मालेगाव महापालिकेत काँग्रेसचा उपमहापौर झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयात टिपू सुलतान यांचा फोटो लावला आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज व टिपू सुलतान हे समकक्ष होते असे




वादग्रस्त विधान केल्याने हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप केला.

या पार्श्वभूमीवर शिवसेना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. आंदोलनादरम्यान सपकाळ यांची प्रतिमा पायदळी तुडवून निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, शिवसेना शहराध्यक्ष विनोद सूर्यवंशी, युवासेना जिल्हा उपाध्यक्ष सौरभ देशमुख, तालुकाध्यक्ष सुशील शेवाळे, भाजप युवामोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, संगीता पुंड आदींनी संतप्त भावना व्यक्त केल्या. या आंदोलनात आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार, दीपाली वाव्हळ, मेघना जेधे, अजित जाधव, प्रवीण कर्पे, सीताराम पानसरे, सनी धारणकर, कृष्णा हासे, तुषार ठाकूर, शशांक नामन, विकास पुंड, प्रवीण दिड्डी, मुकेश मुर्तडक, अवधूत आहेर, वरद बागुल, महेश मांडेकर, भारत गवळी, आशिष कानवडे, संकेत खुळे, लाला दायमा, भैय्या सातपुते, संदेश देशमुख, सुरेश लांडगे, मुकेश मुर्तडक, अनिल चव्हाण यांच्यासह शिवसेना महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

द•ख•ल

## हर्षवर्धन सपकळांचा जाहीर निषेध : अनुजा साळवी

**झरेकाठी** : काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी श्री छत्रपती शिवरायांची तुलना क्रूरकर्मा टिपू सुलतानशी केल्याचे वक्तव्य अत्यंत संतापजनक आहे. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेची माफी मागावी. अशी मागणी डॉ. विखे कृषी परिषद मुंबई अध्यक्षा व भाजप माजी महिला सरचिटणीस अनुजा साळवी यांनी केली आहे. अनुजा साळवी यांनी आपल्या निवेदनात म्हंटले आहे की, श्री छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत, स्वाभिमानाचे प्रतीक आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आहेत.

त्यांच्या महान कार्याची तुलना क्रूरकर्मा टिपूसुलतानाशी करणे हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान आहे. मी त्यांच्या या वक्तव्याचा जाहीर निषेध व्यक्त करते आणि त्यांनी तात्काळ संपूर्ण महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी, अशी ठाम मागणी करते. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाशी कोणीही तडजोड करू शकत नाही असे ही त्या म्हणाल्या.

## सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने फराळ वाटप



**नेवासा** : तालुक्यातील टोका येथे पुरातन महिमा असलेल्या श्री सिद्धेश्वर मंदिर प्रांगणात श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने दर्शनासाठी आलेल्या हजारो शिव भक्तांना केळी फराळाचे व पाणी पाऊचचे वाटप करण्यात आले. नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते केळी व फराळ वाटप उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सिद्धेश्वर बहुउद्देशिय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शांतवन खंडागळे, संस्थेचे विश्वस्त माजी सरपंच वसंतराव डावखर, सुनील बाकलीवाल, बाळासाहेब पाटील, संतोष फिरोदिया, टोका गावचे माजी सरपंच भारत गवळी, सुभाष दिघे, दीपक आगळे, संस्थेचे मार्गदर्शक पत्रकार सुधीर चव्हाण, कडूबाळ रासने, अमित सावंत, उमेश लहारे, युवा उद्योजक शुभम उगले, काकासाहेब खंडागळे, दीपक आव्हाळे, माजी सरपंच राहुल लकारे, राजेंद्र कदम, भगवान कोरडे, रविंद्र अहिरे, नितीन भालेराव उपस्थित होते.

## निवडणुका जाहीर न झाल्याने पुणतांबेकरांचा अपेक्षाभंग

**पुणतांबा** : अहिल्यानगर जिल्हा येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणुका अद्याप जाहीर न झाल्याने पुणतांबा परिसरातील इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाल्याने मतदारांचा कल कुणाकडे आहे. याचा अंदाज उमेदवारांना आला आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून अनेकांनी निवडणुकीच्या तयारीला वेग दिला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातून तिकीट मिळविण्यासाठी इच्छुकांनी समाजमाध्यमांवर गट तयार करून भावी उमेदवार म्हणून प्रचार सुरू केला आहे. विशेषतः राहाता तालुका येथे कोणाला तिकीट मिळणार व कोण निवडून येणार, याबाबत चर्चांना उधाण आले आहे. काही स्थानिक नेत्यांकडून साहेबांकडून तिकीट मिळवून देतो असे आश्वासन दिल्याची चर्चा असल्याने अनेक जण सक्रिय झाले आहेत. उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी सुरू केल्या असून, ठरावीक मंडळे व गटांना मदत, शब्द देणे आणि कार्यक्रमांचे आयोजन सुरू झाले आहे. दोन दिवसांपासून थंडी कमी झाली असली तरी राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे. गावातील पाणीप्रश्न व विकासकामांपेक्षा सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचीच अधिक चर्चा रंगताना दिसत आहे.

## गंगाधर औताडेंना आदर्श शेतकरी पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : शेती क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून, शास्त्रोक्त पद्धतींचा अवलंब करून आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत उत्पादनात लक्षणीय वाढ साधल्याने कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक गंगाधर गणपतराव औताडे यांना आकाशवाणी अहिल्यानगर केंद्र यांच्यातर्फे आदर्श शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

आकाशवाणी अहिल्यानगर केंद्र यांच्यातर्फे रेडिओ किसान दिनाचे आयोजन रविवारी दि.१५ रोजी अहिल्यानगर येथील आकाशवाणी केंद्रात करण्यात आले होते. या कार्यक्रमात कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखानाचे संचालक गंगाधर गणपतराव औताडे यांना आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गंगाधर औताडे यांनी शेती पद्धतीत सुधारणा पाणी



व्यवस्थापन सेंद्रिय व संतुलित खतांचा वापर तसेच शेतीत यांत्रिकीकरणाचा अवलंब करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या कार्यामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली आहे.

या पुरस्काराचे वितरण कार्यक्रम प्रमुख सुदाम बटुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, सकाळचे सहसंपादक प्रकाश पाटील, ज्येष्ठ पत्रकार सुधीर लंके, महात्मा फुले कृषी विद्यापीठातील प्रसारण केंद्रप्रमुख डॉ. सचीन सदाफळ, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, दहिगावनेच्या केव्हीकेचे प्रमुख शामसुंदर कौशिक, आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे, उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे आदींसह मोठ्या प्रमाणात पुरस्कार्थी शेतकरी उपस्थित होते.

## भागवताचार्य कविताताई यांच्या कीर्तनाने महाशिवरात्रीची सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी येथे नगरवाडी व सोनेवाडी सीमेवर असलेल्या सिद्धेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीच्या निमित्ताने विधिवत पूजा पाठ करण्यात आला. भागवताचार्य कविताताई साबळे यांच्या कीर्तनाने महाशिवरात्रीच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

राऊत परिवार व ग्रामस्थांच्या लोकसभागातून मागच्या वर्षी सिद्धेश्वर महादेव मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले. सालाबाद प्रमाणे प्रत्येक वर्षी महाशिवरात्रीचा मोठा उत्सव साजरा करण्याचा मानस राऊत परिवाराने बोलून दाखवला. रविवारी सकाळी सिद्धेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. दुपारी कविताताई साबळे यांच्या कीर्तनानंतर आलेल्या भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. राऊत परिवाराच्या वतीने महाराजांचा सन्मान करण्यात आला.



विक्रम कुलकर्णी गुरु यांच्या हस्ते सकाळी सहा वाजता सिद्धेश्वर महादेवाला अभिषेक करण्यात आला. पवित्र गोदावरी नदीचे जल तरुणांनी महादेवासाठी आणले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धेश्वर महादेव भक्त मंडळ व ग्रामस्थांनी विशेष प्रयत्न केले.

## हरेगाव येथे माता रमाई जयंती उत्साहात; वंचितचे शक्तिप्रदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : सामाजिक न्याय, महिलांचे सशक्तीकरण व बहुजन एकतेचा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार करत वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने हरेगाव येथे माता रमाई आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम केवळ जयंतीपुरता मर्यादित न राहता वंचित बहुजन आघाडीच्या वाढत्या संघटनशक्तीचे ठळक शक्तिप्रदर्शन ठरला.

कार्यक्रमास वंचितच्या राज्य उपाध्यक्ष दिशा ताई शेख, राज्य प्रवक्त्या उत्कर्षा ताई रूपवते, जिल्हाध्यक्ष नगरसेवक संतोष चोळके, महासचिव मधुकर साळवे, युवा जिल्हाध्यक्ष प्रवीण आल्हाट, युवा महासचिव सुनील वाघमारे व श्रीरामपूर निरीक्षक साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. भीम गीतांच्या जलशाने परिसर निळ्या विचारांनी दुमदुमून गेला.याच वेळी हरेगाव व उंदिरगाव येथे वंचितच्या नव्या शाखांचे उद्घाटन झाले. उंदिरगाव शाखा अध्यक्षपदी प्रवीण बोधक तर हरेगाव शाखा अध्यक्षपदी किरण झाल्टे यांची नियुक्ती जाहीर झाली. वर्षाताई निकम यांच्यासह अनेक महिलांनी पक्षप्रवेश केला.

तालुका अध्यक्ष डॉ. गौतम चित्ते यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शन करताना दिशा ताई शेख व उत्कर्षा ताई रूपवते यांनी अन्यायाविरोधात रस्त्यावरची लढाई अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. एकूणच हा सोहळा सामाजिक प्रबोधन व संघटनात्मक विस्ताराचा ठोस एल्गार ठरला.

## शिवध्वज पूजनाने महाशिवरात्री उत्सव साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय परिसरात असलेल्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय (ओम शांती केंद्र)येथे शिवध्वज पूजन करून विविध अध्यात्मिक कार्यक्रमाने महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला.विद्यालयाच्या प्रमुख राजयोगिनी सरला दीदींच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ओम शांती केंद्राच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी नगर येथील राजयोगिनी लता दिदी,नेवासा केंद्राच्या वंदना दिदी,नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, माजी नगरसेविका डॉ.निर्मलाताई सांगळे, माजी होमगार्ड समादेशक पत्रकार बाळासाहेब देवखिळे, मुकिंदपूर ग्रामपंचायतचे सरपंच सतीशदादा निपुंगे,मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष रावसाहेब घुमरे, इंजिनियर संभाजी मते, मेजर कैलास म्हैसमाळे, मुंगसे गुरुजी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिव लिंगाचे पूजन करण्यात आले. चंदन तिलक



लावून मान्यवरांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने ओम शांती केंद्राच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या शिवध्वजाचे पूजन व ध्वजारोहण पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना महेश पाटील म्हणाले, आज ओम शांती केंद्राला दिलेल्या भेटीमुळे एक नवी ऊर्जा मिळाल्याचे समाधान मिळाले, केंद्राद्वारे होत असलेल्या प्रबोधन कार्यामुळे अध्यात्मिकता वाढीस लागत असल्याचे त्यांनी सांगितले.वंदना दिदी म्हणाल्या, महाशिवरात्रीच्या निमित्ताने शिव परमात्मा यांचे या धरतीवर दिव्य अवतरण झाले आहे. कलियुगाच्या अज्ञान अंधकाराच्या रात्रीमध्ये येऊन ज्ञानाचा प्रकाश शिव परमात्मा देत आहेत.याचीच आठवण म्हणून त्यांची शिवरात्री साजरी केली जाते. यावेळी राजयोगिनी लता दिदींनी महाशिवरात्रीचा महिमा आपल्या प्रवचन सेवेद्वारे विषद केला. यावेळी दुपारच्या सत्रात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेष्ठ पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले तर प्रमिलादिदी क्षीरसागर यांनी आभार मानले.

## श्री काशीविश्वेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने निमित्त नेवासा शहरातील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या पुरातन श्री काशीविश्वेश्वर मंदिरात हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना दिवसभर शाबुदाना खिचडी फराळाचे वाटप करण्यात आले.

मंदिराच्या प्रांगणात पहाटेपासूनच भाविकांची दर्शनासाठी रीघ लागली होती. यामध्ये महिला भगिनींची संख्या लक्षणीय होती. काशीविश्वेश्वर मंदिर परिसराच्या विकासासाठी व येथील धार्मिक वैभव वाढण्यासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने मंदिरासह प्रांगणात करण्यात आलेली विद्युत रोषणाई भाविकांचे आकर्षण



ठरले होते. यावेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे स्वागत काशी विश्वेश्वर मंदिर जीर्णोद्धार समितीच्या वतीने करण्यात आले. भाविकांनी या प्रसंगी केलेल्या हर हर महादेवच्या गजराने येथील वातावरण शिवमय बनले होते.



(छाया-सुधीर चव्हाण)

## दलित वस्ती निधीचे प्रस्ताव न पाठवल्याने उपनगराध्यक्षा यांचा जाब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतीकडून सन २०२५२६ या आर्थिक वर्षासाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कामांचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे न पाठविल्याबाबत उपनगराध्यक्षा सौ. शालिनीताई संजय सुखदान यांनी मुख्याधिकारी निखिल फराटे यांना निवेदन देत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तातडीने प्रस्ताव पाठवून निधी मिळवावा, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की नेवासा नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक २ व १६ हे अनुसूचित जातींसाठी आरक्षित असून, दरवर्षी आण्णाभाऊ साठे दलितवस्ती सुधार योजनाअंतर्गत निधी उपलब्ध होतो. मात्र आजवर नगरपंचायतीकडून कोणतेही प्रस्ताव सादर न झाल्याने सुमारे ५८ लाख ६५ हजार रुपयांचा निधी वापराविना पडून आहे.

इतर नगरपंचायती व नगरपालिकांनी प्रस्ताव सादर करून निधी खर्च केल्याचे उदाहरण देत, प्रस्ताव न पाठवल्यास हा निधी अखर्चित ठरून शासनाकडे



जाईल, असा इशारा देण्यात आला. त्यामुळे प्रभाग २ व १६ मधील नागरिक या योजनेपासून वंचित राहतील, असेही नमूद केले आहे.प्रभाग २ मधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी मुंबादेवी मंदिराजवळ दोन लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारून जुनी विहीर जोडण्याचा प्रस्ताव तातडीने पाठवावा, अशी मागणी करण्यात आली. विशेष सभा बोलावून प्रस्ताव मंजूर न केल्यास जबाबदारी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची राहील, असा इशाराही उपनगराध्यक्षा शालिनीताई सुखदान यांनी दिला आहे.

कोर्ट नं.३ रे दि.न्या.क.स्तर
नेमलेली तारीख १३/०३/२०२६
निशाणी नं.

अॅड.अंकुश बी.शिंदे
संगमनेर कोर्ट, संगमनेर

**जाहीर नोटीस**

मे.सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन, संगमनेर यांचे कोर्टात
वा.चौ.अ.नं.११/२०२६ नि.५
मोहन नारायण पावसे व इतर -- **अर्जदार**
**विरूद्ध**
राहुल नारायण पावसे -- **सा.वाला**

ज्याअर्थी नारायण भोमा पावसे हे दि.०८/११/२०२५ रोजी मयत झाले आहे. म्हणून अर्जदारांनी अर्जदार नं.१ ते ५ यांनी व सा.वाला हे मयत नारायण भोमा पावसे यांचे कायदेशीर वारस आहे, असे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी वारस चौकशी अर्ज क्र.११/२०२६ दाखल केला आहे. तो दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, संगमनेर यांचे न्यायालयात प्रलंबित आहे. त्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ व सा.वाला हे मयत नारायण भोमा पावसे यांचे कायदेशीर वारस आहे. याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत किंवा या प्रकरणाची पुढील नेमलेली ता.१३/०३/२०२६ रोजी आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वतः किंवा वकिलांमार्फत संगमनेर येथील ३ रे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात हरकत नोंदवाणी. जर वर नमूद मुदतीत कोणाची काहीही हरकत आली नाही तर सदर प्रकरणाचे कामकाज कोणाची काहीही हरकत नाही असे समजून निकाली काढण्यात येईल. ता.०९/०२/२०२६

तयार करणार
क.लिपीक

हुकुमावरून
सहा.अधिक्षक
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
संगमनेर

## त्रिवेणीश्वर येथे महाशिवरात्री उत्सवाची काल्याच्या किर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील हंडीनिमगाव-सुरेश नगर गावच्या मध्यावर असलेल्या स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्री निमित्ताने आयोजित पंचदिनात्मक सोहळयाची देवस्थानचे महंत श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. आपला प्रपंच उत्कर्षाकडे नेण्यासाठी गुरूविषयी असलेली श्रध्दा अपार ठेवा,धर्म वैभव वाढीसाठी प्रपंचात दोन्ही हाताने दान करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन महंत रमेशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी



बोलतांना केले.

यावेळी बोलतांना महंत रमेशानंदगिरीजी महाराज म्हणाले की सर्व भक्त परिवाराने एकत्रित येत महाशिवरात्रीचा हा पंचदिनात्मक सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान दिले म्हणून महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या वैभवात पार पडला यासाठी सर्वांनी तन मन धनाने योगदान दिले त्याबद्दल त्यांनी सुरेशनगर-हंडीनिमगाव यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ भक्त परिवार व दात्यांचे आभार मानत त्यांना धन्यवाद दिले. त्रिवेणीश्वर देवस्थान हे प्रभू रामचंद्र भगवंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेले क्षेत्र असून मी असेल नसेल परंतु भविष्यकाळात त्रिवेणीश्वरचा ध्वज हा उंचच उंच फडकत राहील, महान तपस्वी योगीराज प्रल्हादगिरीजी महाराजांचे वास्तव्य या ठिकाणी झाले आहे या क्षेत्राचा महिमा व वैभव वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रित यावे तसेच येथे सुरू असलेल्या विकासात्मक कार्याला पुढे येऊन हातभार लावावा असे आवाहन केले. यावेळी झालेल्या सांगता प्रसंगी महाशिवरात्री उत्सवात योगदान देणाऱ्या दात्यांचा यावेळी श्रीफळ प्रसाद उपरणे देऊन महंत रमेशानंदगिरीजी महाराजांच्या हस्ते गौरविण्यात आले.यावेळी काल्याची दहीहंडी फोडून महाआरतीने महाशिवरात्री उत्सवाची सांगता करण्यात आली.

यावेळी झालेल्या किर्तन प्रसंगी रामनाथ महाराज पवार,ज्ञानेश्वर महाराज हजारे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,राजाराम महाराज साठे,नर्मदा माता मंदिराचे गोरख बाबा,बदाम महाराज पठाडे,श्रीधर महाराज अनुभुले,सतीश महाराज धनगर,कृष्णा महाराज बोबडे, प्रमोद महाराज रोकडे,विकास महाराज जाधव,गणेश महाराज शेजुळ, प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे, जनार्धन पटारे,कल्याणराव उभेदळ,बन्सी भाऊ आगळे, भिवाजीराव आघाव,अण्णासाहेब जावळे, मनोहर जाधव, गोरख गुंजाळ,प्रकाशदेवा मुळे,प्रकाश महाराज वाघुले, किरण जाधव यांच्यासह त्रिवेणीश्वर भक्त मंडळातील सेवेकरी तरुण मंडळाचे कार्यकर्ते पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्रामपंचायत डाऊच खुर्द**
ता. कोपरगाव जि .अहिल्यानगर

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत डाऊच खुर्द ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार ,पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. नं. | योजनेचे नाव | कामाचे नाव | निविदा रक्कम | कामाचा कालावधी | फॉर्म फी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग | अंगणवाडी शौचालय दुरुस्ती | ४०२८८ | ३ महिने | ३००/- | सु.बे. |
| २ | १५ वा वित्त आयोग | ग्रामपंचायत कार्यालय परिसर स्वच्छता व अनुशंगिक कामे | १६७२६६ | ३ महिने | ३००/- | खुला |
| ३ | १५ वा वित्त आयोग | जि.प.शाळा स्टेज बांधकाम करणे | १३०४८६ | ३ महिने | ३००/- | सु.बे. |
| ४ | १५ वा वित्त आयोग | व्हॉल चेंबर बांधकाम व पाईपलाईन करणे | २५४१२९ | ३ महिने | ३००/- | सोसायटी |

**अटी व शर्ती** - १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.१७/२/२०२६ते २३/२/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. २४/२/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**डाऊच खुर्द, ग्रामपंचायत ता कोपरगाव.**

# पान १ वरुन

## फिर्यादी असूनही मलाच मारहाण

सुनील धुमाळ, मच्छिंद्र मढवी आणि जनार्दन धायगुडे अशा सात जणांना अटक केली होती. मात्र, न्यायालयात सरकारी पक्ष आरोपींविरोधात ठोस आणि विश्वासार्ह पुरावे सादर करू शकला नाही. परिणामी, इगतपुरी न्यायालयाने सातही आरोपींची निर्दो ष मुक्तता केली.

न्यायालयीन निकालानंतर मुक्त झालेल्या आरोपींच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त करत, खोटी तक्रार दाखल होण्यामागे काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करावी, तसेच खोटी तक्रार देऊन यंत्रणेची दिशाभूल केल्याप्रकरणी संदीप पाटील यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणीही पुढे आली आहे.

दरम्यान, संदीप पाटील यांनी पोलिसांकडून झालेल्या कथित मारहाणीविरोधात आणि आपल्याला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याच्या प्रयत्नांविरोधात उच्च न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ४०० कोटींच्या कथित कंटेनर चोरी प्रकरणात पुढे आणखी कोणते खुलासे होतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## अजितदादांच्या निधनानंतर ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा

दर्जाचं प्रमाणपत्र देण्यात आलं. अल्पसंखअयाक विकास विभागाकडून अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देणं अपेक्षित होतं. मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी ही मंजुरी दिली. विशेष बाब म्हणजे १२ ऑक्टोबर २०२५ ला माणिकराव कोकाटेंनी या प्रमाणपत्र वाटपाला स्थगिती दिली होती. कोकाटेंना मंत्रिपद सोडावं लागल्यानंतर हा विभाग अजित पवारांकडे होता. त्यांच्या निधनानंतर अवघ्या काही तासांतच मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी हा प्रताप केल्याचं समोर आलं.

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य सरकारने तीन दिवसांचा शासकीय दु:खवटा जाहीर केला होता. राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून अवघ्या चार दिवसांत तब्बल ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणावरुन विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली.

'अजितदादांच्या निधनाच्या दिवशी ज्या सह्या करण्यात आल्या आणि शाळांना अल्पसंख्याक दर्जाची प्रमाणपत्रं देण्यात आली हे नेमकं कोणाच्या इशाऱ्यावर केलं? याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत की अजून कोणी आहे, हे महाराष्ट्राला कळलं पाहिजे. अजितदादा खमके व्यक्तिमत्त्व होते, प्रशासनावर त्यांची मजबूत पकड होती. त्यांच्या निधनातून सावरण्याआधीच असे कृत्य झाले असेल, तर याची संपूर्ण जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारली पाहिजे. दोषींवर तत्काळ कारवाई झाली पाहिजे. टाळूवरचे लोणी खाणे ही म्हण इथे लागू पडते. त्यामुळे या घटनेचा आणि सरकारचा आम्ही निषेध व्यक्त करतो.'

– हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

## प्रभारी मुख्याध्यापकाची गळफास घेऊन आत्महत्या

वर्षीय बालिकेला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन आणि निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत बिल्डर आणि पार्किंग सिस्टमच्या संचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ९ च्या सुमारास अस्वानी गॅलक्सी सोसायटीच्या गार्डनमध्ये श्रीजा अनिल सांगळे वय ३ वर्षे ९ महिने ही चिमुकली इतर मुलांसोबत खेळत होती. या गार्डनच्या अगदी जवळच एफ विंगचे पार्किंग पिट खड्डा आहे. मात्र, या खड्ड्याला कोणतीही संरक्षक भिंत, कठडा किंवा साधी जाळी देखील लावलेली नव्हती. खेळण्याच्या ओघात श्रीजा या अर्धवट बांधकाम असलेल्या १५ फूट खोल खड्ड्यात पडली. या अपघातात तिच्या डोक्याला आणि पाठीला गंभीर दुखापत झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, अस्वानी पॅराडाईज कंपनीचे बिल्डर आणि किंग मल्टीलेव्हल कार पार्किंग सिस्टमचे संचालक जगन्नाथ राऊत यांच्यावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्किंगच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना न केल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. वाकड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# पकडलेली वाळूची वाहने पळवली ३० लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** महसूल पथकाने पकडलेली वाळूची वाहने पोलीस पाटीलांच्या ताब्यात देण्यात आली; मात्र ही वाहने पोलिस पाटलांना धमकावून पळवून नेल्याची घटना वैजापूर तालुक्यात घडली. या प्रकारामुळे उपविभागीय अधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड यांनी कडक कारवाईचे आदेश देत गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिल्यानंतर दोन जणांविरुद्ध पोलिसांत स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

जळगावचे पोलीस पाटील राजू भडाईत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मिनी टिप्परचा चालक दिनेश शिंदे (रा. रोटेगाव) याच्याविरुद्ध बेकायदेशीररित्या शासनाच्या ताब्यातील पकडलेले वाळूचे वाहन दमदाटी करून पळवून नेल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला असून या कार्यवाहीत १५ लाख रुपये किंमतीची मिनी टिप्पर वं चार हजार रुपये किंमतीची दोन ब्रास वाळू असा सुमारे १५ लाख आठ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तर राजू भडाईत यांनीच दिलेल्या फिर्यादीवरून गणेश पंजाब गायकवाड (राहणार जळगाव) याच्याविरुद्ध गुन्हा करण्यात आला आहे. या कारवाईत १५ लाख ५० हजा रुपये किंमतीचा मिनी टिप्पर व आठ हजार रुपये किंमतीची दोन ब्रास वाळू असा १५ लाख ५८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जकरण्यात आला आहे.

गुन्हे दाख; परवाना निलंबनाचा दणका उपविभागीय अधिकारी अरुण जऱ्हाड यांनी संबंधित वाहन मालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिताची संबंधित कलम तसेच महाराष्ट्र गौण खनिज कायद्यानुसार तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर शासकीय कामात अडथळा आणणे आणि सार्वजनिक मालमत्तेची चोरी केल्याबद्दल गुन्हे नोंदवण्यात आले. संबंधित वाहनांचे परवाने निलंबित करून वाहने जप्त ठेवण्याबाबत आरटीओला स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.या प्रकरणाची सविस्तर माहिती जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आली असून, दोन दिवसांच्या आत अनुपालन अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वाळू माफियांच्या वाढत्या दादागिरीला लगाम घालण्यासाठी महसूल, पोलीस आणि परिवहन विभाग यांच्यात समन्वय वाढवण्यात आला आहे. संयुक्त पथकांमार्फत कठोर आणि वेगवान कारवाईची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. अशी माहिती उपविभागीय अधिकारी अरुण जऱ्हाड यांनी दिली.

## बनसोडे इंग्लिश स्कूलने राबवला एक दिवस बाजार उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील माका येथील गुणवत्ता,संस्कार व संस्कृती जपणारी व उपक्रमशील शाळा म्हणून नावाजलेली कै.तात्याबा बनसोडे इंग्लिश मीडियम स्कूल च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नाविन्यपूर्ण उपक्रम ''एक दिवस बाजाराचा'' घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी बाजारामध्ये जाऊन विविध फळे, पालेभाज्या, किराना दुकाने, कापड बाजार, मिठाईंच्या दुकानांना विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी दुकानदाराशी संवाद साधला. भाज्या कुठून येतात ? किलोचा दर काय? नफा-तोटा कसा समजतो? या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी मिळवली. व विद्यार्थ्यांनी स्वतः वस्तूच्या किमती, मालाची निवड आणि वजन मापे यांची प्रत्यक्ष पाहणी केली. व बाजारातील खरेदी विक्रीची प्रक्रिया त्यांनी जवळून अनुभवली. व व्यवसायातील बारकावे समजून घेतले. व भाजीपाल्याचे भाव विचारणे,वस्तूंची निवड करणे, पैशाची मोजणी करणे. यासारख्या गोष्टी अनुभवल्या. व वस्तू खरेदी करून व्यवहाराचा आनंद घेतला.या उपक्रमामुळे ''पुस्तकात वाचण्यापेक्षा प्रत्यक्ष बाजारात येऊन किलो,ग्रॅम, पैशाचे व्यवहार, पैशाची नियोजन, याची समज वाढली अशा प्रतिक्रिया काही विद्यार्थ्यांमधून आल्या. विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारिक कौशल्य व व्यवहार



ज्ञान विकसित व्हावे, वस्तूंचे भाव कसे ठरतात,नफा तोटा समजावा, मालाची प्रतवारी व वस्तूंची खरेदी विक्री समजण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती संस्थेच्या संचालिका मीना बनसोडे यांनी दिलीविद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, सांघिक कार्य आणि नियोजन कौशल्य विकसित होतात, लहान वयातच विद्यार्थ्यांना पैशाचे मूल्य कळतात व आर्थिक व्यवहार कसे होतात याचे धडे मिळतात. व अशा उपक्रमामुळे विद्यार्थी भविष्यातील व्यवहारिक आव्हानासाठी सज्ज होतील. असा विश्वास संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष प्रा. सागर बनसोडे यांनी व्यक्त केला. पालकांनी ही या उपक्रमाचे कौतुक केले.

## आयडियल शाळेत संत सेवालाल महाराज यांची जयंती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** मालुंजा -सिरजगांव फाटा येथील आयडियल इंग्रजी शाळेत संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

या प्रसंगी शाळेचे संस्थापक अशोक राठोड, सचिव सुनिता राठोड,उपाध्यक्ष तेजस राठोड यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी संस्थापक अध्यक्ष अशोक राठोड यांनी आपल्या भाषणातुन संत सेवालाल महाराजांचे बंजारा समाज, भटक्या, आदिवासी समाजासाठीचे कार्य व त्यांची शिकवण याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.



# सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील निमगावजाळी येथील माधुरी मनोज अरगडे (वय -२८) या विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून शेततळ्यात उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मयत विवाहितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात पती आणि सासूविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वडील बाळासाहेब रंगनाथ कोटकर (रा. अंभोरे, ता. संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मयत माधुरी हिचे लग्न १० वर्षापूर्वी निमगावजाळी येथील मनोज भास्कर अरगडे याच्याशी झाले होते. लग्नानंतर काही महिने सुखात गेल्यानंतर घरगुती कारणावरून पती मनोज आणि सासू मिराबाई भास्कर अरगडे यांनी माधुरीला शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. तिला वारंवार शिवीगाळ व मारहाण केली जात असे. या त्रासाला कंटाळून डिसेंबर २०२५ मध्ये माधुरी आपल्या दोन मुलांसह (शिवांश आणि विरांश) माहेरी अंभोरे येथे निघून आली होती.



काही दिवसांपूर्वी नातेवाईकांच्या मध्यस्थी आणि चर्चेनंतर तिला पुन्हा नांदण्यासाठी सासरी पाठवण्यात आले होते. मात्र, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी माधुरी घरातून बेपत्ता झाल्याची माहिती सासरच्या मंडळींनी माहेरच्यांना दिली. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेऊनही ती मिळून आली नाही.

१२ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास औरंगपूर गावच्या शिवारातील एका शेततळ्यात माधुरीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. मुलीच्या मृत्यूची बातमी समजताच माहेरच्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सासरच्या सततच्या छळाला कंटाळूनच माधुरीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे.

दरम्यान पोलिसांनी पती मनोज भास्कर अरगडे आणि सासू मिराबाई भास्कर अरगडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली आश्वी पोलीस करत आहे.

## निधन वार्ता

### मंजुळाबाई आंबरे



**गणोरे :** मंजुळाबाई भिमाजी आंबरे यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी शुक्रवार नूकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले तीन मुली सुना, नातू व जावई असा मोठा परिवार आहे लोकमान्य बिगर शेती पतसंस्थेचे अध्यक्ष किसन आंबरे यांच्या त्या आई होत.

### गोपीनाथ घोरपडे



**प्रवरानगर :** राहता तालुक्यातील निर्मळ पिंपरी येथील जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी गोपीनाथ दशरथ घोरपडे वय (८५)यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन मुली,सून,नातवंडे, असा परिवार आहे. शिर्डी संस्थान येथे कार्यरत असलेले लक्ष्मण गोपीनाथ घोरपडे यांचे ते वडील होत.

### मोहन बोरूडे



**पुणतांबा :**परिसरातील चांगदेव नगर येथे राहणारे मोहन झुंबर बोरुडे (वय ६४) यांचे काल अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे एक भाऊ एक बहिण असा परिवार आहे. बारुकू बोरूडे यांचे ते बंधू होत.

### ज्ञानदेव उंडे



**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथील शेतकरी कुटुंबातील ज्ञानदेव मुरलीधर उंडे वय (८० वर्ष) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा ,दोन मुली, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. योगेश उंडे याचे ते वडील होत.

### बाबासाहेब कराळे



**शिराळ चिचोंडी** :पाथर्डी तालुक्यातील शिराळा येथील कै बाबासाहेब पुंजाजी कराळे (वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांनी शिराळ गावचे सरपंचपद भूषविले तसेच विकास सेवा सोसायटीचे चेअरमन म्हणून पाच वर्ष काम केले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन भाऊ, तीन बहिणी, तीन मुली, भाऊजाया, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### मिना डोंगरे



**श्रीरामपूर :** संगमनेर तालुक्यतील निमज येथील मिना रोहिदास डोंगरे यांचे अल्पशा आजराने निधन झाले. त्याच्या पश्चात सासरे , पती , दोन मुले, सुना, नातवंडे , दिर , पुतने , पुतनी असा परिवार आहे , मुख्याध्यापक रोहीदार डोंगरे यांच्या त्या पत्नी तर शुभम व अजिंक्य यांच्या मातोश्री होत.

# श्रीरामपूरात मिश्रीत दूषित पाण्याचा पाणीपुरवठा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पिण्याच्या पाण्याचा नळाङरे शहरातील नागरिकांना गटारीचे घाण पाणी मिश्रीत दूषित पाण्याचा पाणी पुरवठा केला जात आहे तो पाणी पुरवठा स्वच्छ आणि नियमित होत नाही तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा इशारा यावेळी समाजवादी पक्षाचेवतीने देण्यात आला आहे. समाजवादी पक्षाच्यावतीने काल सोमवार दि. १६ फेब्रुवारी पासून नगर परिषदेच्या गेटवर उपोषण सुरू केले आहे.

श्रीरामपूर नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे पिण्याचे पाण्याच्या नळाङरे पंजाबी कॉलनी, सिंधी कॉलनी, काझीबाबा रोड परिसर, नेहरूनगर परिसर, आदर्श हौसिंग सोसायटी, जमादारनगर तसेच श्रीरामपूर शहर आदि भागात नगर परिषदेच्या पिण्याच्या पाण्याचा नळाङरे शहरातील नागरिकांना गटारीचे घाण पाणी मिश्रीत दूषित पाण्याचा पाणी पुरवठा केला जात आहे.

यामुळे आ. हेमत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी जातीने लक्ष घालून त्वरीत नागरिकांच्या या ज्वलंत समस्येसंबंधी तात्काळ कठोर पावले उचलावीत आणि शहरातील समस्त त्रस्त नागरिकांना उचित न्याय देत तात्काळ पिण्यासाठी स्वच्छ पाण्याचा पुरवठा कसा केला जाईल याकडे लक्ष घालावे अशी समाजवादी पार्टीच्यावतीने मागणी करण्यात येत आहे. खोटे-नाटे रिपोर्ट सादर करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवक्षर देखील कायदेशीर कार्यवाही करावी, अशीही आमची मागणी आहे. यासाठी त्रस्त नागरिकांसह समाजवादी पार्टी काल सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून नगर परिषदेच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. यावेळी माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक यांनी उपोषणस्थळी भेट देवून या उपोषणाला पाठिंबा दिला.



# अशोक पॉलिटेक्निकच्या मैदानावर

## क्रिकेट स्पर्धेत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकने पटकावले विजेतपद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ संलग्न पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांसाठी आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना अंतर्गत आयोजित आंतर विभागीय दक्षिण व उत्तर झोन क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना अशोकनगर येथील अशोक पॉलिटेक्निकच्या अशोक जिमखाना मैदानावर उत्साहात पार पडला.

या अंतिम स्पर्धेत बेलवंडीच्या इंदिरा गांधी पॉलिटेक्निकने विजेतेपद पटकावले या अंतिम सामन्यात बेलवंडी येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निक व संगमनेर येथील अमृतवाहिनी पॉलिटेक्निक हे दोन बलाढ्य संघ आमनेसामने आले होते, अशी माहिती प्राचार्य अंजाबापू शिंदे यांनी दिली.अमृतवाहिनी पॉलिटेक्निक संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ८ षटकांच्या या सामन्यात पॉवर प्लेनंतर अमृतवाहिनी संघाची धावसंख्या २ बाद १९ अशी होती. अर्शद याने १८ चेंडूत १७ धावांची खेळी साकारत संघाची धावसंख्या ५७ वर नेली. त्यामुळे इंदिरा गांधी पॉलिटेक्निक समोर ५८ धावांचे आव्हान उभे राहिले.

दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना इंदिरा गांधी पॉलिटेक्निक संघाच्या साहिल शेख व आदित्य लोखंडे यांनी दमदार सुरुवात केली. आदित्य लोखंडे याने अवघ्या १८ चेंडूत ४२ धावा करत ५ षटकार व २ चौकारांची आतषबाजी केली. अखेर ९ गडी राखून इंदिरा गांधी पॉलिटेक्निक संघाने सामना जिंकत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन अशोक कारखान्याचे व्हाइस चेअरमन बाबासाहेब आदिक यांच्या हस्ते झाले, तर बक्षीस वितरण अशोक कारखान्याचे चेअरमन व माजी

या सामन्याचे समालोचन अरुण कडू यांनी केले. पंच म्हणून प्रताप राऊत व निलेश शेरकर यांनी काम पाहिले, तर गुणलेखनाची जबाबदारी महेश डोंगरे व अविनाश बिडगर यांनी पार पाडली.

इंदिरा गांधी पॉलिटेक्निक संघाचे प्रशिक्षक मिलिंद शेलार व बंडू पवार, तर अमृतवाहिनी पॉलिटेक्निक संघाचे प्रशिक्षक डॉ. सुनील सांगळे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि . १७ फेब्रुवारी २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२५ २८० ८४० | ८-१ | १३७ ३८० ३३५ | जोड ८०-४१-२५-९७-१६ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १३८ ३७० ३३४ | ०-२ | १३६ २४६ ६६० | जोड ०६-४२-१८-३५-२९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| ३९० ४८० २२८ | २-८ | १७० ३५० ८०० | जोड २१-३८-५४-७९-८० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# ‘कामांचा डोंगर’ की कागदी अहवाल ?

## सत्ता संपली ; कामांचा दर्जा घसरला ! तालुक्यातील ७० ग्रामपंचायतींवर प्रशासक




### ग्रामस्थांचा सूर

रस्ते झाले, पण पावसात उखडतात, पाणीपुरवठ्याच्या योजना कागदावरच, स्वच्छ भारतचे फलक आहेत, पण गटारे तुंबलेली, दलित वस्तीच्या निधीची पळवापळवी

श्रीगोंदा तालुक्यातील अनेक गावांत सरपंच ग्रामसेवक यांनी गावकीचा कारभार हाकताना दलितांच्या नावावर आलेला निधी इतरत्र पळवापळवी केल्याची धक्कादायक प्रकार समोर येत असून याबाबत गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी दलित संघटना करत आहेत

### प्रशासक राजवट म्हणजे तात्पुरती सोय की कायमची सवय?

प्रशासक नेमणूक ही निवडणुका होईपर्यंतची तात्पुरती यंत्रणा असते. पण स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी नसल्याने निर्णय प्रक्रियेत लोकांचा थेट सहभाग कमी झाल्याची भावना व्यक्त होत आहे. ग्रामसभांचे आयोजन कमी, पारदर्शकता कमी आणि जबाबदारी ठरवणे कठीण अशी टीका काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

### निधी विरुद्ध गुणवत्ता

गेल्या काही वर्षांत विविध शासकीय योजनांतून निधी उपलब्ध झाला. मात्र कामांची गुणवत्ता, देखभाल आणि दीर्घकालीन नियोजन याकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले गेले का, हा प्रश्न उपस्थित होतो आहे.

**प्रतिनिधी / दादा सोनवणे**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील एकूण ९१ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ७० ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर त्या ठिकाणी प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. लोकप्रतिनिधींच्या जागी प्रशासकीय कारभार सुरू असला, तरी गावपातळीवरील कामकाजाचा दर्जा मात्र समाधानकारक नसल्याची ग्रामस्थांची भावना आहे.

श्रीगोंदा तालुक्याच्या ९१ पैकी ७० ग्रामपंचायतीची मुदत संपली आल्यामुळे तालुक्यात लवकरच ग्रामपंचायत निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणुकीपूर्वी विकासकामांच्या दाव्यांची शहानिशा, लेखापरीक्षण आणि सार्वजनिक चर्चेची मागणी जोर धरू लागली आहे.अनेक गावातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, करसंकलन, दिवाबत्ती अशा मूलभूत सेवांमध्ये अनेक ठिकाणी अडचणी कायम आहेत. काही गावांमध्ये पाणीटंचाईवर ठोस उपाय नाही, तर काही ठिकाणी विकासकामांची गती मंदावल्याचे चित्र आहे.दरम्यान, माजी सरपंच आणि पदाधिकारी मात्र त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामांची यादी पुढे करत आहेत. आम्ही कोट्यवधींची कामे केली, निधी आणला, योजना राबवल्या, असा दावा अनेकांचा आहे. मात्र अनेक गावातील ग्रामस्थांचा प्रश्न पडलाआहे जर इतकी कामे झाली, तर गावांची अवस्था अशी का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे मात्र गावकऱ्यांचा मुद्दा स्पष्ट आहे गावाची नावे बदलली, पाट्या बदलल्या; पण दर्जा कधी बदलणार?

# महाशिवरात्रीनिमित्त शिवालयात भाविकांची मांदियाळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : शेवगावच्या पूर्वभागातील श्रीक्षेत्र नागलवाडी येथील श्री काशिकेदारेश्वर हे शिवालय रामायण कालातील तर घोटण येथील श्री मल्लिकार्जूनेश्वर महादेवाची स्थापना मल्लिक ऋषी व अर्जुनने केली आहे या शिवाय धाकटे शिखर शिंगणापूर म्हणून लौकिक असलेल्या माळेगाव ने येथील श्री महादेव देवस्थानाला ऐतिहासिक परंपरा आहे या देवस्थाना सह गुंफा येथील श्री काळेश्वर देवस्थान, शेवगावातील धनगर गल्लीतील श्री महादेव मंदिर, खालची वेस परिसरातील छत्रीचा महादेव, श्री क्षेत्र अमरापूरच्या रेणुका माता देवस्थानातील महादेव आदि देवस्थाने रविवारी महाशिवरात्रीच्या निमित्ताने पहाटेपासूनच हजारो भाविकांच्या गर्दीने फुलून गेली.



श्री काशी केदारेश्वर देवस्थानात आमदार मोनिकाताई राजळे यांनी महा अभिषेक घालून दर्शन घेतले तर माळेगावनेच्या महादेवस्थानातही त्यांनीउपस्थिती लावून मनोभावे दर्शन घेतले. यावेळी महंत बाबागिरी महाराज .केशव आंधळे . धनंजय बडे . शुभम गाडे .गंगा खेडकर .भीमराज सागडे संदीप खराड सुरेशराव नेमाने गणेश रांधवणे अंबादास आंधळे शिवाजीराव भिसे चंद्रकांत गरड चंद्रशेखर महाराज मुरदारे भाऊसाहेब मुरकुटे, अंबादास ढाकणे यांचेसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुंफाच्या काळेश्वर मंदिरात माजी आ.चंद्रशेखर घुले पाटील व माजी जी प अध्यक्षा राजश्री घुले या उभयतांच्या हस्ते महाअभिषेक करून आरती करण्यात आली - यावेळी परिसरातील भाविकांची उपस्थिती होती. माळेगावनेच्या देवस्थानात आज पांडुरंग महाराज झुंबड यांचे कीर्तन झाले . यावेळी अनेक दिंड्या देवस्थानात आल्या होत्या. देवस्थानचे विश्वस्त बाबा वाकडे व त्यांचे सहकारी यांनी सोहळ्याचे नेटके नियोजन केले होते. श्री क्षेत्र अमरापूरच्या देवस्थानातील महादेव मंदिरात रेणुका भक्तानुरागी, ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रशांत नाना भालेराव, श्रीमंत घुले, डॉ. अरविंद पोटफोडे,बाळासाहेब चौधरी यांनी महा अभिषेक घालून पूजा केली. श्री क्षेत्र घोटण येथील प्राचिन देवस्थानातही श्री मल्लिकार्जुनेश्वर महादेवाच्या दर्शनाला भाविकांची अलोट गर्दी उसळली . महाशिवरात्रीचे औचित्य साधून गेली दोन दिवसापासून घोटणला यात्रेचे स्वरूप आले आहे .

# शिवमहापुराणातून जीवनाला दिशा : बाबा महाराज ढवळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : शहरातील तपनेश्वर महादेव मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त ११ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या पाच दिवसांत शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले. आज रोजी भक्तिमभावाने या शिवपुराण कथेचे व महाप्रसादाने सांगता झाली.

यावेळी ह.भ.प.रामायणाचार्य बाबा (महाराज) ढवळे (हळगावकर), ह.भ.प.कृष्णा महाराज, ह.भ.प.रविंद्र महाराज यांच्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी ह.भ.प. रामायणाचार्य बाबा ढवळे यांनी प्रभावी उपदेश करताना सांगितले की, इतिहासातील कठीण काळात अनेक शिवमंदिरे उद्ध्वस्त झाली; परंतु अशा प्रतिकूल परिस्थितीतही छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्य रक्षणासाठी स्वतःचे जीवन अर्पण केले.

त्यांच्या विचारांचे, शौर्याचे आणि संस्कारांचे अनुकरण आजच्या पिढीने करणे ही काळाची गरज आहे. देशासमोर विभाजनाच्या आणि मतभेदांच्या छाया दाटत असताना हिंदू समाजाने एकजुटीने उभे राहणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आजच्या गतिमान युगात सर्वांना वेदशास्त्रांचा सखोल अभ्यास करणे शक्य नसले तरी पुराणातील कथा सर्वसामान्यांना सहज समजतात. या कथांमधून जीवनातील वेदना सहन करण्याची शक्ती, धैर्य आणि सकारात्मक दृष्टिकोन मिळतो. शिवमहापुराण हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवनाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शक आहे.

खरे ज्ञान प्राप्त झाल्यावर कर्तृत्वाचा अहंकार नाहीसा होतो आणि माणूस अधिक संयमी, सजग व मूल्यनिष्ठ बनतो. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री तपनेश्वर महादेव मंदिर समिती सेवा मंडळाचे सेवेकरी आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास ग्रामस्थ भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# सुजित झावरे यांचे नेतृत्व प्रभावी : आ. शरद सोनवणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे हे लोकाभिमुख काम करणारे व कार्यक्षम नेतृत्व असून, शिवसेना पक्षवाढीसाठी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन शरददादा सोनवणे यांनी केले. निघोज येथील वेताळबाबा स्टेडियमवर गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या लोकनाथ क्रिकेट स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. ही स्पर्धा एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आली होती.



बक्षीस वितरण आमदार सोनवणे यांच्या हस्ते झाले. यावेळी अळकुटी गावच्या सरपंच कोमल भंडारी यांनी कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. तसेच बाजार समितीचे माजी सभापती अरुण ठाणगे यांची तालुका शिवसेना प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. कोमल भंडारी यांची शिवसेना महिला आघाडीच्या तालुका प्रमुखपदी नियुक्तीचे पत्र जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले. कार्यक्रमास युवासेनेचे जिल्हाप्रमुख नितीन दादा शेळके, कामगार सेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्नील घुले, ओबीसी सेलचे जिल्हाप्रमुख खंडूजी भुकन, उद्योजक नितीन शेळके, सरपंच योगेश रोकडे, धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार सोनवणे म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून विकासकामांना गती मिळाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेला यश मिळाले असून, अहिल्यानगर जिल्ह्यात पक्षबळ वाढत आहे. सरकारच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. सुजित झावरे पाटील म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार सक्षमपणे काम करीत असून, ग्रामीण विकासासाठी ठोस निर्णय घेतले जात आहेत. कोमल भंडारी यांच्या प्रवेशामुळे निघोज-अळकुटी जिल्हा परिषद गटात शिवसेनेला बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात कोमल भंडारी व अरुण ठाणगे यांचा सत्कार करण्यात आला.

निशाणी नं.६
नेमलेली ता.२७.०३.२०२६

ॲड.एन.ए.मोटे

**जाहीर नोटीस**

वारस चौकशी अर्ज नं. १९/२०२६
नेवासा येथील में. दिवाणी न्यायाधिश साहेब व स्तर यांचे कोर्टात

**अर्जदार**
१. शुभांगी सुहास चव्हाण वय ५०
धंदा काही नाही
२. सिपोरा सुहास चव्हाण यव १९
धंदा शिक्षण
दोघी रा.वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर

**सामनेवाले**
कोणी नाही.
सुहास उर्फ सुभाष विठ्ठलराव चव्हाण
मयत दि. ११.१२.२०१४

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं. १९/२०२६ दाखल केलेला आहे. अर्जदार नं १ यांचे मयत सुहास उर्फ सुभाष विठ्ठलराव चव्हाण हे पती असुन अर्जदार नं. २ यांचे ते वडिल आहे. तसेच मयत सुहास उर्फ सुभाष विठ्ठलराव चव्हाण यांना अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नव्हते व नाही. मयत सुहास उर्फ सुभाष विठ्ठलराव चव्हाण यांचे नावे बैंक ऑफ बडौदा शाखा वडाळा बहिरोबा, ता. नेवासा येथे बचत खाते नं.२०४१०१०००००३७५ हे खाते असून सदरचे खात्यात रु २,४०,६४८.२८/- अरु. दोन लाख चाळीस हजार सहाशे अष्ठेचाळीस रूपये अठ्ठावीस पैसे अशी रक्कम दि २९.०१.२०२६ अखेर दिसुन आलेली आहे. सदर रकमेस अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत ताक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्याच्या आत किंवा दि.२७.०३.२०२६ पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवुन हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणमें नाही असे समजून में. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयत सुहास उर्फ सुभाष विठ्ठलराव चव्हाण यांचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि. १२.०२.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे. पुढील नेमलेली तारीख २७.०३.२०२६

शिक्का

**आदेशावरून**
**सह अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर नेवासा**

# द • ख • ल

## कत्तलखान्यावर छापा; ८० किलो गोमांसासह एकाला अटक

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असतानाही, शहरात गोवंशाची कत्तल करून मांस विक्री करणार्या एका इसमावर कॅम्प पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. भिंगार येथील आलमगीर परिसरात रविवारी सकाळी पोलिसांनी छापा टाकून ८० किलो गोमांसासह एका आरोपीला रंगेहाथ पकडले.मिळालेल्या माहितीनुसार, आलमगीर मदरसा समोरील जमजम किराणा दुकानाशेजारी असलेल्या एका गाळ्यात गोवंशाची कत्तल केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार रविवारी सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास पोलिसांनी त्या ठिकाणी धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी १६ हजार रुपये किमतीचे ८० किलो गोमांस आणि मांस कापण्यासाठी वापरलेले लोखंडी सत्तूर असा एकूण १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## पिंपळगाव वाघा येथे ‘कुसुमाग्रज वाचन अभियान’ उत्साहात



**अहिल्यानगर** : ’वाचाल तर वाचाल आणि शिकाल तर टिकाल’ असा संदेश देत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव वाघा येथील विद्यार्थ्यांनी आज ’कुसुमाग्रज वाचन अभियाना’ अंतर्गत गावामध्ये वाचन संस्कृतीचा जागर केला. ग्रंथदिंडी आणि घोषणांनी दुमदुमले गाव.*या निमित्ताने कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेपासून ग्रंथदिंडीने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी हातात फलक धरून विविध घोषणा दिल्या. या माध्यमातून श्रध्दा सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल श्रीमती यमुना कांडेकर -कर्डिले यांनी दैनंदिन जीवनात वाचनाचे महत्त्व पटवून देत वाचन करण्याचे आवाहन करण्यात आले.

## अस्तगावमध्ये खडी क्रेशरमुळे पिकांचे नुकसान : शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

**अहिल्यानगर** : पारनेर येथील मौजे अस्तगावमध्ये सुरू असलेल्या खडी क्रेशरमुळे शेजारील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचा आरोप करत संबंधित क्रेशर तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. रेखा अविनाश काळे या अस्तगाव येथील कायमस्वरूपी रहिवासी असून त्यांच्या मालकीची शेतीमध्ये आहे. शेजारील गट क्रमांक २७९ मध्ये सुरू असलेला खडी क्रेशर दिवस-रात्र सुरू राहत असल्याने त्यातून निर्माण होणारी धूळ व फुफाट्यामुळे त्यांच्या व शेजाऱ्यांच्या शेतातील पिकांवर मोठा परिणाम होत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. पिकांवर सतत धूळ साचत असल्याने उत्पादन घटत असून आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. यासंदर्भात संबंधित व्यक्तींना वेळोवेळी भेटून माहिती देण्यात आली असली तरी अद्याप कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आदिवासी पारधी समाजातील गरीब कुटुंब असल्याने शेती हा मुख्य उदरनिर्वाहाचा स्रोत असून, या परिस्थितीमुळे कुटुंबास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कुस्तीमध्ये इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्याचे राज्यस्तरीय यश

**लिंपणगाव** : समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे आई.ई.डी.एस.एस.ए.ई. झोन १ अंतर्गत आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकचा विद्यार्थी गौरव खर्चे याने ९७ किलो वजन गटामध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कुस्ती या क्रीडाप्रकारात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, व्हॉ.चेअरमन मेघाताई औटी, सर्व संचालक मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे, क्रीडा शिक्षक मिलिंद शेलार, विभागपमुख हवालदार व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी गौरवचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या विजयामुळे संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे.

# लोककलेचे जतन ही काळाची गरज

## तमाशा मराठी माणसाचा प्राण : डॉ. संजय नगरकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककलेने हजारो वर्षे समाजाचे सांस्कृतिक व वैचारिक पोषण केले आहे. संत एकनाथांपासून ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपर्यंत भारुडे, गोंधळी, वासुदेव, पिंगळा, वगनाट्य, भराडी अशा लोककलांनी केवळ मनोरंजनच नव्हे तर सामाजिक प्रबोधनाची समृद्ध परंपरा निर्माण केली. मात्र यंत्र-तंत्राच्या युगानंतर नवी पिढी परकीय कलांकडे अधिक आकर्षित होत असून, तमाशाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन आजही हिणकस आहे. तो बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे मत दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी व्यक्त केले.



ते सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दादा पाटील महाविद्यालयातील शारदाबाई पवार सभागृहात आयोजित दहा दिवसीय तमाशा प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते. यावेळी संभाजीनगर येथील लोककलावंत दलितमित्र भास्कर (आबा) राऊत, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पाटील, ज्येष्ठ तमाशा कलावंत हसनभाई पाटेकर, लोककलेचे अभ्यासक भगवान राऊत तसेच राज्यभरातून आलेले प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. नगरकर पुढे म्हणाले की, अलीकडेच युनेस्कोने लोककलेला केंद्रस्थानी अधिष्ठान दिल्याची घोषणा केली असून, यामुळे तमाशासारख्या लोककलांना सामाजिक प्रतिष्ठा मिळण्यास निश्चितच मदत होईल.

काही चित्रपटांमधून साकारलेल्या कथांमुळे तमाशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकृत झाला; मात्र गण, गवळण, बतावणी, वगनाट्य यांमधून मोठे सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडविण्याची क्षमता तमाशामध्ये आहे. तमाशा हा मराठी माणसाचा प्राण असून तो जपण्याची जबाबदारी नव्या पिढीवर आहे. प्रकाश पाटील यांनी महाराष्ट्रातील उपेक्षित व वंचित घटकांनी लोककलेचे खऱ्या अर्थाने संरक्षण केल्याचे नमूद केले.

या शिबिरात शिकविलेल्या बाबी प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्षात आणाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. ५ ते १४ फेब्रुवारीदरम्यान झालेल्या या शिबिरात तबलावादन, गण-गवळण, बतावणी, वगनाट्य अभिनय, पटकथा लेखन यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. दलितमित्र पुरस्कार विजेते भास्कर आबा जाधव, मारुती आखाडे (कोर्टी), वसंत चव्हाण (कोर्टी), मुरली शिंदे (मोरगाव, ता. वाळवा), दिनकर पठारे (वैजापूर), चंद्रकांत शिंदे (कापरेवाडी), रेखा चव्हाण (कोरेगाव), शिवकन्या चव्हाण (संगमनेर) व संदीप पंचराज (आंबेगाव) यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींनी महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रमांतर्गत सादरीकरण केले. समारोप वगनाट्याने झाला. प्रास्ताविक व स्वागत हसनभाई पाटेकर यांनी, तर आभार भगवान राऊत यांनी मानले.

पाच विद्यार्थिनींचा सहभाग; कुटुंबांचे कौतुक या शिबिरात साक्षी काळे, पायल पोकळे, स्वराली सोनवणे, कोमल जाधव व पौर्णिमा घोडके या पाच महाविद्यालयीन विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

# शाळेच्या संस्कारांची परतफेड करण्याची हीच योग्य वेळ : बाबासाहेब भोस



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : शाळेने दिलेल्या संस्कारांची परतफेड करण्याची हीच योग्य वेळ असून, संघटनेच्या माध्यमातून विद्यालयाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे. असे वक्तव्य बाबासाहेब बोस यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घोगरगाव येथे माजी विद्यार्थी संघटनेची सहविचार सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस होते, यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक चळवळीचा वारसा पुढे नेण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी संघटित होण्याची गरज अधोरेखित केली. याप्रसंगी विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

प्रा. वसंत नरवडे यांनी माजी विद्यार्थी संघटनेमागील संकल्पना स्पष्ट करताना सांगितले, माजी विद्यार्थ्यांचे विद्यालयाशी स्नेहबंध कायम राहावेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आर्थिक बळकटी, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, वैचारिक समृद्धी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलण्यास संघटना प्रभावी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सभेस सरपंच सुजाता भोसले, उपसरपंच डॉ. दिलीप भोस, सेवानिवृत्त प्राचार्य अविनाश गांगर्डे, पत्रकार उज्वलाताई उल्हारे यांच्यासह अनेक मान्यवर माजी विद्यार्थी उपस्थित होते. सभेत माजी विद्यार्थी संघटनेची अधिकृत स्थापना व नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, लवकरच कार्यकारिणी जाहीर करून पुढील कार्ययोजना निश्चित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यालयाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

द • ख • ल

## तळेगाव ढमढेरे येथे बोअरवेल व्यावसायिकावर मारहाण

### तिघांविरोधात गुन्हा दाखल

**तळेगाव :** येथील पेट्रोल पंप परिसरात बोअरवेल व्यवसायिकावर मारहाण झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र मुरलीधर रसाळ (रा. पाटवस्ती शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे) हे त्यांच्या बोअरवेल मशीनसह संबंधित ठिकाणी कामासाठी उपस्थित असताना आर्यन राजेंद्र नवले (रा. कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे) हा आपल्या दोन साथीदारांसह तेथे आला. यावेळी त्यांनी राजेंद्र रसाळ यांना शिवीगाळ व दमदाटी करत तू येथे धंदा करायचा नाही, तू येथे धंदा कसा करतो हेच बघतो, अशी धमकी दिली. त्यानंतर तिघांनी मिळून त्यांना मारहाण करून जखमी केल्याची फिर्याद देण्यात आली आहे.

या घटनेनंतर राजेंद्र रसाळ यांनी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. पोलिसांनी आर्यन राजेंद्र नवले व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरोधात गुन्हा नोंद केला असून पुढील तपास पोलीस हवालदार किशोर तेलंग करत आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुढील तपास सुरू आहे.

## शेतकऱ्याचा मुलगा बनला कृषी अधिकारी



**लोणी धामणी :** मनात जिद्द आणि मेहनत करायची तयारी असेल तर कोणतेही स्वप्न सत्यात उतरायला वेळ लागत नाही. आपल्या आई–वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत जारकरवाडी ( ता. आंबेगाव ) येथील विशाल झुंबर भांड या तरुणाने मनाशी पक्कं ठरवलं आणि अधिकारी होण्यासाठी त्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली त्याचे प्रयत्न इतके प्रामाणिक होते की त्यामुळे तो परीक्षेत पास झाला आणि कृषी अधिकारी श्रेणी २ पदाला गवसणी घातली आहे विशाल भांड यांची प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण जारकरवाडी येथे झाले. इयत्ता दहावीत विशालने ९२% गुण संपादन करून जारकरवाडी येथील आदर्श विद्यालय प्रथम आला होता बारावी सायन्स मंचर ( ता. आंबेगाव ) येथील महात्मा गांधी विद्यालयात झाले बी एस्सी शिक्षण रायगड जवळील महाड येथे झाले तर एम एस्सी शिक्षण नागपूर येथे झाले विशाल भांड सध्या जळगाव येथे कृषी सहाय्यक म्हणून सेवा करत आहे

विशालचे कुटुंब सर्व सामान्य शेतकरी आहेत शिक्षण करतानाच त्याने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरु केला. यादरम्यान त्याने स्पर्धा परीक्षा देऊन त्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मोठं यश मिळवलं आहे. विशालच्या या यशाबद्दल जारकरवाडी ग्रामस्थांनी विशालचे अभिनंदन केले आहे.

## शिवजयंतीनिमित्त १०१ दिव्यांगांना साधनांचे वाटप

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या 'जय गणेश रुग्णसेवा अभियान' अंतर्गत आयोजित शिबिरात शिवजयंती उत्सवानिमित्त १०१ दिव्यांग व्यक्तींना स्वयंचलित कृत्रिम हात, व्हीलचेअर व ट्रायसायकल यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या शिबिरासाठी पिनॅकल इंडस्ट्रिज लिमिटेड, इनाली फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउन यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाला ट्रस्टचे सर्व विश्वस्त, मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ही माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.



## निरा–बारामती मार्गावर झाडाची फांदी धोकादायक अवस्थेत



**सोमेश्वरनगर**–निरा–बारामती मार्गावरील सोरटेवाडी हद्दीत सहा फाटा परिसरात बाभळीच्या झाडाची मोठी फांदी रस्त्यावर पडण्याच्या स्थितीत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. सोमेश्वरनगर येथे शैक्षणिक संकुल तसेच सोमेश्वर सहकारी साखर कारखाना असल्याने ऊसतोड बैलगाड्या, ट्रक, ट्रॅक्टर, तसेच विद्यार्थी व नोकरदारांची वाहने सतत ये–जा करत असतात. सहा फाटा नजीक वडाच्या झाडालगत असलेल्या बाभळीची फांदी धोकादायकरीत्या झुकलेली असल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने फांदी काढून आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## कळसगावात पालखी विसावाचे लोकार्पण

### वारकऱ्यांसाठी सुसज्ज सुविधा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**आळंदी :** वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पारंपरिक पालखी सोहळ्यातील विसावा क्रमांक २ या ठिकाणाचे लोकार्पण केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि औसा संस्थेचे हभप गुरुबाबामहाराज औसेकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. आळंदी रोडवरील कळसगाव येथे खासदार निधीतून हा विसावा उभारण्यात आला आहे. या वेळी खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार बापूसाहेब पठारे, पिंपरी–चिंचवडचे महापौर रवी लांडगे, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त डॉ.राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज लोंढे, ॲड.रोहिणी पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच पालखी मालक बाळासाहेब पवार, श्रीनाथ भिमाले, प्रकाश मस्के, अनिल उर्फ बॉबी टिंगरे, रेखा टिंगरे, उदय गायकवाड, अश्विनी भंडारे, संगीता दांगट, पांडुरंग ठाकूर,आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकार्पणप्रसंगी बोलताना मोहोळ म्हणाले, आषाढी वारीच्या शतकानुशतकांच्या परंपरेत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली ज्या जागी विसाव्यासाठी थांबत असत, त्या ठिकाणासाठी योगदान देण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे. कळसगावातून पूर्वी आळंदीच्या मंदिराचा कळस दिसायचा, म्हणूनच गावाला 'कळस' हे नाव पडले. त्यामुळे या विसाव्याला वारी परंपरेत विशेष महत्त्व आहे. आळंदी ते पंढरपूर या भक्तीमार्गावरील प्रवासात पालखी विसावे ही केवळ विश्रांतीची ठिकाणे नसून भक्ती, एकता आणि सेवाभावाची केंद्रे आहेत. कळस येथे उभारलेले हे सुसज्ज विसावास्थान वारकऱ्यांना विश्रांती, सुरक्षितता आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वारकरी संप्रदायाच्या या भक्तिमय परंपरेत कळसगावातील विसावा क्र.२ नव्या उर्जेचे आणि सेवाभावाचे प्रतीक ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पुरंदर भाजपकडून सासवडमध्ये हर्षवर्धन सपकाळ यांचा तीव्र निषेध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नाझरे सुपे :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अठराव्या शतकातील क्रूरकर्मा शासक टिपू सुलतानची तुलना थेट युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या 'घाणेरड्या' वक्तव्यामुळे तमाम शिवप्रेमींच्या आणि महाराष्ट्रवासीयांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, याचा निषेध करण्यासाठी पुरंदर–हवेली भारतीय जनता पार्टीच्या वतीने सोमवारी (ता. १६) सासवड येथील शिवतीर्थावर आक्रमक निदर्शने करण्यात आली.

सोमवारी सकाळी भाजपच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी शिवतीर्थावर एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून वंदन केले. त्यानंतर सपकाळ यांच्या विधानाचा निषेध करण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. स्वराज्य संस्थापक शिवरायांची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही, असे वक्तव्य करणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि इतिहासाचा घोर अपमान आहे, असा आक्रमक पवित्रा कार्यकर्त्यांनी यावेळी घेतला. या निषेध आंदोलनाप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे, निरा मार्केट कमिटीचे सभापती संदीप फडतरे, शैलेश तांदळे, शहराध्यक्ष आनंद जगताप, संभाजी काळाणे, मंडल अध्यक्ष संजय निगडे, संदीप कटके आणि साकेत जगताप उपस्थित होते. तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, शैलेंद्र ठकार, विठ्ठल मोकाशी, चंद्रकांत बोरकर, तुषार ढुमे, सागर जगताप, तुषार जगताप, संपत जाधव, हर्षवर्धन पायगुडे यांसह भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व शिवप्रेमी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुरंदरच्या राजकीय वर्तुळात या आंदोलनाचे तीव्र पडसाद उमटले आहेत. ऐतिहासिक तथ्यांची मोडतोड करून एका क्रूर शासकाचे उदात्तीकरण करणे आणि त्याची तुलना महाराजांशी करणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. सपकाळ यांनी तात्काळ माफी मागावी, अशी मागणी यावेळी भाजपाच्या पदाधिका–यांनी केली.

## दिवे परिसरातील कांदा थेट परराज्यात विक्रीसाठी रवाना



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

------------

**दिवे, पुणे :** पुरंदर तालुक्यातील दिवे, कोडित, चांबळी, बोपगाव, मावडी व परिंचे परिसरात सध्या कांदा काढणीला वेग आला आहे. मात्र बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पुणे बाजार समितीत सध्या कांद्याला प्रतिकिलो अवघा १२ ते १३ रुपये दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. यामुळे शेतकरी अधिक दराच्या आशेने आपला कांदा थेट परराज्यात विक्रीसाठी पाठवत आहेत.

पुरंदर तालुक्यातून दररोज अनेक टन कांदा बेळगाव व बेंगळुरू बाजारपेठेत रवाना होत आहे. स्थानिक बाजारभावापेक्षा काही प्रमाणात जादा दर मिळत असला तरी वाहतूक खर्चामुळे शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित नफा राहत नाही. सध्या डिझेल दरवाढीचा मोठा फटका वाहतुकीवर बसला असून एक टन कांद्यामागे तब्बल तीन ते साडेतीन हजार रुपये भाडे मोजावे लागत आहे. टोल नाके व इतर खर्चामुळे वाहतूकदारांनाही भाडेवाढ करणे भाग पडत असल्याचे वाहतूक व्यावसायिक उमेश थिटे यांनी सांगितले. दरम्यान, उत्पादन खर्च, वाहतूक खर्च आणि बाजारातील अस्थिर दर यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला योग्य हमीभाव द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## राज्यस्तरीय शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने गणेश खानदेशे यांचा गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** गरुडझेप प्रतिष्ठानचे पुणे जिल्हा अध्यक्ष आणि आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील सामाजिक कार्यकर्ते गणेशभाऊ खानदेशे यांना संजीवनी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अण्णाभाऊ साठे नाट्यमंदिर, सिन्नर (नाशिक) येथे सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल''शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' माजी मंत्री.बच्चू कडू ,शेतकरी नेते रविकांत तुपकर, पद्मश्री पुरस्कार (भारत सरकार) प्राप्त लोककलावंत रघुवीर खेडकर, राज्य महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षा रुपवते,जिल्हा परिषद सदस्य उदय सांगळे, महाराष्ट्र राज्य संजीवनी फाऊंडेशनचे चेअरमन डॉ.ज्ञानेश्वर सानप यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गणेश खानदेशे यांनी गरुडझेप प्रतिष्ठानच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यातील दिडशे जिल्हा परिषद शाळांमध्ये आरोग्य शिबीरे घेऊन विद्यार्थ्यांना सुवर्णप्राश आयुर्वेदिक डोस, हिमोग्लोबिन, रक्तगट,दंत,मुखरोग,नेत्र, तपासणी, तसेच उच्च रक्तदाब, डायबिटीस तपासणी करुन रुग्णांना गोळ्या औषधे ,फळेवाटप, कार्यक्रम, महिला सबलीकरण मेळावे, शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,विविध स्पर्धांचे आयोजन,वृक्षारोपण, निराधारांना मदत,शेतीपूरक व्यवसाय प्रशिक्षण, असे विविध प्रकारचे कार्यक्रम गेली पंचवीस वर्षे राबविले आहेत.त्यांना सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय ''शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' मिळाल्याबद्दल त्यांचे पुणे जिल्ह्यातील विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. यावेळी मंचर नगरपंचायतचे नगरसेवक तथा सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती धनेश मोरडे, महानगर बँकचे मॅनेजर विकास खानदेशे, गरुडझेप प्रतिष्ठानचे संचालक ॲड.कुणाल बाणखेले,जितेंद्र पोखरकर, कालिदास गांजाळे,ॲड.संजय पाटील,अनिकेत निघोट, सुभाष मोरडे, संकेत मोरडे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध भागातून मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुस्तकाने ज्ञान वाढते, मस्तक घडते : अभय शास्त्री

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाघोली (पुणे) :** पुस्तकाने ज्ञान वाढते व मस्तक घडते या विचाराचा प्रत्यय देत पुणे येथील ज्येष्ठ अभ्यासू व सामाजिक कार्यात सदैव सक्रिय असलेले चार्टर्ड अकाउंटट अभय शास्त्री यांनी वाघोली येथील भूमी फाउंडेशनच्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील निवासी मुलींसाठी विविध विषयांवरील समृद्ध पुस्तक संच भेट दिला. या पुस्तक संचामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, चरित्रग्रंथ, साहित्य, विज्ञान, इतिहास तसेच प्रेरणादायी कथांचा समावेश आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या व प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी हा संच ज्ञानाचा नवा दीपस्तंभ ठरणार आहे.

या प्रसंगी बोलताना अभय शास्त्री म्हणाले, पुस्तक हेच खरे मार्गदर्शक आहे. योग्य वाचनाची सवय लागली तर मुली केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर मानसिक व बौद्धिकदृष्ट्याही सक्षम होतील. समाजाने अशा उपक्रमांना पाठिंबा देणे ही काळाची गरज आहे.

संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास पवार यांनी सांगितले की, निवासी प्रकल्पातील मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच वाचन संस्कार अत्यंत महत्त्वाचे आहेत. या पुस्तक संचामुळे आमच्या ग्रंथालयाची उभारणी अधिक सक्षम होईल व मुलींना स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी मोठी मदत मिळेल.

या वेळी मुलींनी अभय शास्त्री यांचे आभार मानत नियमित वाचनाची सवय जोपासण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे मुलींच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास झळकला. समाजातील विविध घटकांनी अशा प्रकारे पुढाकार घेतल्यास ग्रामीण व वंचित घटकांतील मुली शिक्षणाच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडवू शकतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



**वाघोली येथील भूमी फाउंडेशनच्या निवासी मुलींना पुस्तक संच प्रदान करताना अभय शास्त्री व संस्थेचे पदाधिकारी.**

## सणसवाडीत पोलीस बंदोबस्त असताना भर यात्रेत खुलेआम जुगार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**तळेगाव ढमढेरे :** सणसवाडी (ता. शिरुर) येथे महाशिवरात्र निमित्ताने सुरु असलेल्या नरेश्वर मंदिर यात्रेदरम्यान पोलीस बंदोबस्त असताना खुलेआम जुगार सुरु असल्याची घटना समोर आली असून नागरिकांनी तक्रार केल्यानंतर शिक्रापूर पोलिसांनी कारवाईचा फार्स करत भीमराव जाधव व जितेंद्र भोसले या दोघांवर गुन्हे दाखल केले. सणसवाडी (ता. शिरुर) येथे महाशिवरात्र निमित्ताने नरेश्वर महाराज मंदिर यात्रा आयोजित करण्यात आलेली असल्याने सदर ठिकाणी बैलगाडा शर्यतीसह मोठी यात्रा भरलेली असताना पोलीस बंदोबस्त देखील नेमण्यात आलेला होता, मात्र भर यात्रेमध्ये खुलेआम जुगार खेळविला जात असल्याची तक्रार काही नागरिकांनी पोलिस अधिकाऱ्यांकडे केली त्यांनतर सदर ठिकाणी बंदोबस्त साठी हजर असलेले पोलीस हवालदार नरेंद्र गायकवाड व दामोदर होळकर यांनी जुगार अड्ड्यावर कारवाई करत जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करत दोघांना ताब्यात घेतले, याबाबत पोलीस हवालदार नरेंद्र उमाजी गायकवाड यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी भीमराव जाधव व जितेंद्र भोसले या दोघांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार दामोदर होळकर हे करत आहे. फोटो खालील ओळ – सणसवाडी (ता. शिरुर) येथे भर यात्रेत खुलेआम सुरु असलेला जुगार.

## महाशिवरात्री निमित्त दिवे येथे धार्मिक कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दिवे :** दिवे परिसरात महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. दिवे गावठाणातील पूर्वाभिमुख स्वयंभू महादेवाचे प्राचीन मंदिर भाविकांनी फुलून गेले होते. विविध मोडी लिपीतील ताम्रपटांनुसार बाराव्या शतकापूर्वीही या मंदिराचा उल्लेख आढळतो. पुरातन काळात या मंदिरास 'वाघेश्वर मंदिर' म्हणून ओळखले जात असल्याची नोंद आहे.

अलीकडेच लोकसहभागातून मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिर परिसर सुशोभित करण्यात आला आहे. महाशिवरात्रीच्या पहाटे जलाभिषेक करण्यात आल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. त्यानंतर दिवसभर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. पुजारी विजय दिवेकर, दिगंबर दिवेकर व स्वप्निल दिवेकर यांनी स्वयंभू महादेवाच्या पिंडीवर आकर्षक सजावट केली होती. तसेच दिवसभर शिवचरित्र वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी शिवशंभो मित्र मंडळ व ग्रामस्थ दिवे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.



## गणेश भोसले समाजभूषण गौरव पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** सामाजिक बांधीलकी मानून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जेजुरी शहर भाजपा मा.अध्यक्ष गणेश दुर्योधन भोसले यांना श्रीकृष्ण सेवा ट्रस्टच्या वतीने 'समाजभूषण गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. महाशिवरात्री उत्सवाच्या औचित्याने हा गौरव सोहळा पार पडला. श्रीकृष्ण सेवा ट्रस्ट, राख (ता. पुरंदर) यांच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. यंदा रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. साहित्य, कला, संस्कृती, कृषी, आरोग्य, शैक्षणिक आणि आध्यात्मिक अशा विविध क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य केलेल्या इतर १२ जणांना देखील विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गणेश भोसले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र असे असून, उद्योजक दिलीप झेंडे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी श्रीकृष्ण सेवा ट्रस्ट राखचे अध्यक्ष किसन महाराज चव्हाण तसेच गणपत शितकल, गंगाराम जाधव, तुकाराम भांडवलकर, बापूराव खंडाळे, सोमनाथ चव्हाण, सुरज चव्हाण, बाळासो पांचाळ, सोमनाथ मदने, स्वराज साबळे, शेखर रणवरे, वैभव पांचाळ यांसह परिसरातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या सत्काराला उत्तर देताना गणेश भोसले यांनी ट्रस्टचे आभार मानले आणि भविष्यातही समाजकार्याचा हा वारसा असाच सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला. या सन्मानाबद्दल गणेश भोसले यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## विभागीय स्तरावर क्रीडा निपुणता केंद्रात प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील क्रीडा विकासाकरिता 'मिशन लक्ष्यवेध' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पुणे विभागीय स्तरावर ॲथलेटिक्स, वेटलिफ्टींग, शुटींग, रोईंग, लॉन टेनिस, कुस्ती, टेबल टेनिस व हॉकी या आठ खेळांची नऊ क्रीडा निपुणता केंद्र कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली असून प्रवेशासाठी प्राविण्य प्राप्त खेळाडूंनी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन विभागीय क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांनी केले आहे. ॲथलेटिक्स, शुटींग, रोईंग, कुस्ती, टेबल टेनिस या पाच खेळांसाठी प्रत्येकी २० खेळाडूंची व हॉकीसाठी ४० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. यासाठी २५ वर्षाआतील मुले, मुली पात्र असतील. प्रवेशासाठी जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गेल्या २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज ३ छायाचित्र, शाळा–महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र इत्यादी कागदपत्रे आवश्यक राहतील. खेळाडू क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक आहे. शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहील.

निवड झालेल्या खेळाडूंना निवास, भोजन, पूरक आहार खर्च, क्रीडा साहित्य, प्रशिक्षण साहित्य, खेळाडूंचे किट, निवडलेल्या खेळाडूंचे देशांतर्गत, परदेशी प्रशिक्षणासाठी होणारा खर्च, स्पर्धा सहभाग खर्च, खेळाडूंच्या वैद्यकीय चाचण्या, किरकोळ वैद्यकीय उपचाराचा खर्च क्रीडा व युवक सेवा विभागामार्फत करण्यात येईल. इच्छुक व पात्र खेळाडूंनी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, विभागीय क्रीडा संकुल, सर्व्हे नं. १९१, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, मोझे विद्यालयासमोर, येरवडा, पुणे– ४११००६ येथे प्रत्यक्ष अथवा वशींीूंपिशसारळश्र.ले या ईमेलवर विहित मुदतीत अर्ज करावेत. जास्तीत जास्त खेळाडूंनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. नाईक यांनी केले आहे.

# भिंगारमध्ये दीड तास बिबट्याचा थरार !



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहराजवळील भिंगार येथील वडारवाडी परिसरात सोमवारी सकाळी बिबट्याने दर्शन दिल्याने प्रचंड खळबळ उडाली होती. बिबट्याच्या वावरामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील शाळांना तातडीने सुट्टी जाहीर करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परिसरात चोख बंदोबस्त तैनात केला आणि वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, वनविभागाच्या पथकाने आणि पोलिसांनी केलेल्या थरारक प्रयत्नांमुळे बिबट्याला दीड तासात जेरबंद करण्यात यश आले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

सोमवारी सकाळी वडारवाडी परिसरात बिबट्याने दर्शन दिले. बिबट्या दिसल्यामुळे नागरिकांची एकच धांदल उडाली. बिबट्याला पाहण्यासाठी नागरिकांनी घरांच्या गच्चीवर आणि रस्त्यावर मोठी गर्दी केली होती. या गर्दीमुळे बचाव कार्यात सुरुवातीला अडथळे येत होते, मात्र पोलिसांनी जमावाला पांगवत परिस्थिती नियंत्रणात आणली. वनविभागाच्या पथकाने अत्यंत संयमाने आणि कौशल्याने बिबट्याचा शोध घेतला.

भिंगार शहरातील आलमगीर रोडवरील छत्रपती संभाजीराजे चौक भागात एका व्यक्तीच्या बाथरुममध्ये बिबट्या शिरला. त्या बाथरुमला दरवाजा नव्हता. वनविभागाच्या पथकाने बाथरुमला दरवाजा म्हणून जाळ्या लावल्या. बिबट्याला गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध करण्यात आले. त्यानंतर जाळ्याच्या साहाय्याने त्याला सुरक्षितपणे जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. या यशस्वी मोहिमेमुळे भिंगारमधील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

### वन विभाग, भिंगार पोलीस, एलसीबी कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना यश

सकाळीच भिंगार परिसरात बिबट्याने दर्शन दिल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण होते. याची खबरदारी म्हणून भिंगार पोलिसांनी चोख बंदोबस्त लावला. एलसीबीचे पथकही भिंगारमध्ये दाखल झाले. वनविभागाचे वनपरिक्षेत्रअधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल मनीष जाधव, वनरक्षक नितीन गायकवाड, खेडकर, गाडेकर, चेमटे हे ही बिबट्याला पकडण्यासाठी दाखल झाले. सर्वांनी मिळून बिबट्याला जेरबंद केले.

## आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी : नेहाताई महाराज



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** तरुण मुलांनी वृद्ध आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून वृद्धापकाळात त्यांना आधार द्यावा'हीच भगवंत रुपी सेवा असे भावनिक उद्गार समाज प्रबोधनकार नेहा ताई साळेकर महाराज यांनी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

श्रीगोंदा येथील सामाजिक कार्यकर्ते दिवंगत आप्पासाहेब दळवी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त समाजप्रबोधनकार नेहाताई साळेकर भोसले महाराज यांचे कीर्तनरुपी सेवा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी उपस्थित भाविकांसमोर बोलताना नेहाताई साळेकर म्हणाल्या की, मृत्यूला तुमच्या धनसंपत्ती, गाडी, बंगला, पद, प्रतिष्ठा, अधिकार याचे काहीच देणंघणं नाही. त्यासाठी जीवन जगत असताना फक्त आपले कर्तव्य काय हेच पाहिजे आहे. या कीर्तनरुपी सोहळ्यास युवा नेते दिग्विजय नागवडे, खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष दीपक भोसले, माजी उपसभापती बाळासाहेब नलगे, नगराध्यक्ष सुनिता खेतमाळीस, उपनगराध्यक्ष अलकाताई अनभुले, सागर गोरे, अरविंद कापसे, नागवडे कारखान्याचे संचालक प्रशांत दरेकर, भाऊसाहेब नेटके, प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी, शिवसेनेचे नेते नंदकुमार ताडे, याबरोबरच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार संजय दळवी यांनी मानले.

## दखल

### ज्ञानेश कमानदार यांची तालुका कृषी अधिकारीपदी निवड



**नेवासा :** तालुक्यातील बाभूळखेडा येथील रहीवाशी व सध्या सातारा जिल्हा परिषेदेत ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यरत असलेले ज्ञानेश बद्रीनाथ कमानदार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत राज्यात ४८ व्या रँकने तालुका कृषी अधिकारी पदी निवड झाली. ज्ञानेश कमानदार यांचे नेवासा तालुक्यातील बाभूळखेडा येथे पहिली ते चौथी प्राथमिक शिक्षण जळका येथील गुरुदास भास्करगिरी महाराज विद्यालयात ५ वी ते १० वी शिक्षण, ११ वी १२वी लोणी येथील पद्मश्री विखे पाटील पब्लिक स्कूलमध्ये तर सोनई कृषी महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण झालेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, त्यामध्ये ज्ञानेश हा पहिल्याच प्रयत्नात राज्यात ४८ व्या रँकने उत्तीर्ण झाला आहे. ज्ञानेश कमानदार हे नेवासा तालुका तलाठी संघटनेचे अध्यक्ष बद्रीनाथ कमानदार यांचे चिरंजीव आहेत.

### दहिगाव येथे 'कुसुमाग्रज वाचनालय'चे उद्घाटन



**शेवगाव :** जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी धिकारी आनंद भंडारी यांच्या प्रेरणेतून जि. प. मिक शाळा दहिगाव येथे 'कुसुमाग्रज वाचनालय' करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची वड निर्माण व्हावी, त्यांच्या ज्ञानसंपदेत भर वी आणि सर्वांगीण बौद्धिक विकास साधावा उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला हे. पांडुरंग नवले यांच्या हस्ते वाचनालयाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमास सरपंच रामेश्वर भापकर, मा. सरपंच सुनिल खरात, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर गमे, मोहन गरड, दिपक काकडे, अभिजित दुबे, राजेंद्रप्रसाद दुबे, महेश गमे तसेच मुख्याध्यापक लक्ष्मण गायकवाड, शिक्षक ज्ञानेश्वर माळी, मोहन कट्टे व श्रीमती वैजयंतीमाला सावळसुरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी तथा गावचे सुपुत्र पोलीस निरीक्षक गहिनीनाथ सर्जेराव गमे (मुंबई) यांनी वाचनालयासाठी कपाट व दर्जेदार पुस्तके भेट देऊन विद्यार्थ्यांना ज्ञानाचा नवा ठेवा उपलब्ध करून दिला.

### अवैध वाळू वाहतूक व दारू विक्रीविरोधात कारवाईची मागणी

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील खरडगाव परिसरातील नानी नदीपात्र येथे मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन, वाहतूक तसेच बेकायदेशीर दारू विक्री सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळी ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करून तिची वाहतूक केली जात आहे. या प्रकाराला विरोध करणाऱ्यांना धमक्या दिल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले. यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच बेकायदेशीर दारू विक्रीमुळे गावातील अनेक तरुण व्यसनाधीन होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी मोनिका राजळे, शेवगाव तहसील कार्यालय तसेच शेवगाव पोलीस स्टेशन येथे निवेदन दिले आहे.

# अतिप्रखर दिव्यांमुळे रात्रीचा प्रवास ठरतोय जीवघेणा

## विखेंची नाराजी आणि आरटीओची तत्परता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** वाहनांना अनधिकृत, अति-प्रखर दिवे बसवून रात्रीचा होणारा प्रवास सर्वांसाठीच जीवघेणा ठरत आहे. या संदर्भात केंद्र आणि राज्य सरकार तातडीने कार्यवाही करून प्रवाशांचा हा प्रवास सुखकर करतील अशी सर्वसामान्यांना प्रतीक्षा आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी जिल्हा नियोजन समितीत आरटीओ बद्दल नाराजी व्यक्त करताच आरटीओंनी आळस झटकून आपली तत्परता दाखविली आहे. अगदी तशीच तत्परता आरटीओ यांनी कोणाच्याही आदेशाची वाट न पाहता प्रखर दिव्यांच्या विरोधात दाखवावी अशी सर्वसामान्य जनतेची मागणी आहे.

दुचाकी, तीन चाकी तसेच चार चाकी सह इतरही मालवाहू वाहनांना अतिप्रखर (ईीळसहीं) एलईडी (डएऊ) दिवे सरसकट लावले जात आहेत. यामुळे समोरून येणाऱ्या चालकांचे डोळे दिपवून तात्पुरते अंधत्वाची अनेक उदाहरणे यापूर्वी उजेडात आली आहेत.

अतिप्रखर एलईडी दिव्यामुळे गंभीर अपघात घडत असताना केंद्रापासून राज्यापर्यंत तर जिल्ह्यातील सर्वच मंत्री आणि अधिकारी याकडे डोळे झाक करीत आहेत.

चुकीचे फिटिंग मुळे प्रकाश विखुरने , इलेक्ट्रिक सिस्टीमवर ताण येतो यामुळे सर्वसामान्यांच्या अतिप्रखर आणि एलईडी दिव्यांचा हा प्रवास जीवघेना ठरत आहे.

अतिप्रखर आणि एलईडी दिवे बसविल्यानंतर नियमांचे उल्लंघन होऊन कायदेशीर कारवाई व दंडास कारणीभूत ठरू शकते, मात्र अशा प्रकारचे कारवाईचे उदाहरण आजपर्यंत कुठेही पाहायला मिळाले नाही.

वाहनांवर एलईडी बसवणे इतर चालकांसाठी धोका असून यामुळे अनेक अपघातही झाले आहेत. संबंधित आरटीओ अधिकाऱ्यांना तसेच आमदार खासदार अशा सर्वांनाच या अतिप्रखरदिव्यांचा त्रास होत असताना देखील हे अपघातास कारणीभूत ठरणारे दिवे यांच्यावर कारवाई होत नसल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या आदेशाची सर्वांना उत्सुकता लागली आहे. एलईडीचा लख्ख निळा-पांढरा प्रकाश समोरून येणाऱ्या वाहनचालकांचे काही क्षणांसाठी डोळे दिपवतो, ज्यामुळे समोरचे धोके दिसत नाहीत आणि हाच प्रकाश अनेकांना आयुष्यातून उठवणारा ठरत आहे.

प्रखर प्रकाशामुळे समोरच्या चालकाचा अंदाज चुकतो आणि अपघात घडतो. राज्यभरात सर्वाधिक अपघात सध्या या अतिप्रकर आणि एलईडी दिल्यामुळे होत आहेत. तांत्रिक आणि सुरक्षा समस्या हे त्याचे सर्वात मोठे कारण असून चुकीचे फिटिंग हॅलोजन सेटअपमध्ये एलईडी लावल्यास प्रकाश पसरतो आणि तो योग्य दिशेने पडत नाही यामुळेही अपघात घडत आहेत.

अतिप्रखर तसेच एलईडीमुळे बॅटरी ड्रेन चुकीच्या पद्धतीने बसवलेले किंवा जास्त वॅटेजचे लाइट्स बॅटरी लवकर संपवू शकतात, असे असतानाही वाहन धारक हे दिवे लावतात ही बाब गंभीर आहे.

बेकायदेशीर मॉडिफिकेशन करून हे अतिप्रखर एलईडी दिवे बसविले जातात. केंद्रीय मोटार वाहन नियमांनुसार (उचतठ ठीश्रश १०४), प्रकाश पॅटर्न किंवा ब्राइटनेस मानकांचे पालन न करणारे दिवे बेकायदेशीर आहेत. अशा लाइट्समुळे आरटीओ (ठढज) कडून कारवाई व दंड होऊ शकतो,मात्र आरटीओ यांनी या अतिप्रखर तसेच एलईडीदिवे बसवल्यामुळे कुठे दंड केला असे मात्र कुठेच आढळून आले नाही, ही बाब चेष्टेची आहे.

> फॅक्टरी-फिटेड कंपनीकडून आलेले एलईडी सुरक्षित असतात, परंतु बाहेरून बसवलेले स्वस्त आणि अति-प्रखर एलईडी धोकादायक ठरतात, या बाबीशी अधिकारी आणि आरटीओ सहमत असले तरी आजही सर्रास सगळीकडे अतिप्रकर आणि एलईडी दिवे लावून वाहन धावत असल्याचे विदारक चित्र आहे. या विरुद्ध केंद्रापासून राज्यापर्यंत तसेच जिल्ह्यातही अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी आवाज उठवण्याची गरज आहे.
>
> **- लकी सेठी**
>
> शहराध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष श्रीरामपूर

# उलटा चोर कोतवाल को डाटे...

## काळे गटाचा बेबनाव उघड, रणशूर यांनी प्रसिद्ध केले पुरावे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** प्रभाग क्रमांक दोन येथील सुखशांतीनगर येथे संरक्षक भिंतीचे कामाचे भूमिपूजन रेणुकाताई कोल्हे यांच्या हस्ते पार पडले.यावेळी नगराध्यक्ष पराग संधान आणि नगरसेवक उपस्थित होते. वास्तविक पाहता काळे गटाच्या नगरसेविका स्मितताई साबळे आणि त्यांचे पती शैलेश साबळे उपस्थित होते.मात्र अचानक दुसऱ्या दिवशी साक्षात्कार होऊन आम्हाला बोलावले नाही असा बनाव रचून केलेल्या खोट्या आरोपांचे खंडन पुराव्यानिशी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांनी केले आहे.

जर नगरसेवकांना काय कामे सुरू आहे हे माहित नव्हते तर त्यांनी तिथे उपस्थित राहून फोटोसेशन कसे काय केले ? नागरिकांना आदल्या दिवशी उपस्थित रहा असे आवाहन का केले ? निमंत्रण नव्हते तर तिथे स्वतः सौ.साबळे यांनी कुदळ टाकताना फोटो कसे काय उपलब्ध आहेत.काळे गटाला सदर काम सुरू होणार असल्याची पूर्ण कल्पना होती तरीही त्यांनी दुसऱ्या दिवशी पालिकेत जात नाटकी बतावणी केली त्यामुळे उपलब्ध फोटो आणि व्हिडिओ दाखवत कोल्हे गटाने काळे नीती उघड पाडली आहे.

शहरात वेगाने सुरू झालेला बदल पाहून जनतेने नाकारलेल्या नेत्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना पुढे करून खोटे बोलण्यास भाग पाडल्याचा हा प्रकार उघड झाला आहे. साबळे या काळे गटाच्या नगरसेविका त्या भूमिपूजनास उपस्थित होत्या त्यानंतर त्यांनी रेणुकाताई कोल्हे यांना घरी पाहुणचारास निमंत्रीत केले हे उपस्थित सर्वांना दिसले आहे. कदाचित आ. काळे यांनी शहानिशा न करता विनाकारण विकासाला विरोध करण्यासाठी पालिकेत जाण्यास दबाव टाकल्याने त्यांचे लोक गेले असतील असा टोला रणशूर यांनी लगावला आहे.

नगरसेवकांवर काळे यांचा विश्वास नसल्याने त्यांनी पहिल्याच सर्वसाधारण सभेत दरवाजाबाहेर आपला पगारी कर्मचारी ठेवून मिटिंगचे मुद्दे लिहून घेण्यास सांगितले यावरून स्पष्ट होते आहे की काळे यांना फक्त राजकारण करायचे आहे.विकासाला एकीकडे विरोध करायचा आणि माध्यमांसमोर खोटे बोलून आपण कसे साव हे भासवण्याचा प्रयत्न करणे हे हास्यास्पद आहे असे शेवटी रणशूर म्हणाले.

> **सदर भूमिपूजन छायाचित्रात काळे गटाच्या नगरसेविका स्मिता साबळे या भूमिपूजन प्रसंगी सहभागी असल्याचे दिसते आहे**

# कुणाच्या हौसेसाठी आयत्या पिठावर रेघा ओढून

## अनधिकृत भूमिपूजन करू नका : नगरसेवक शिरसाठ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी :** आ. आशुतोष काळे यांनी मंजूर करून आणलेल्या निधीतून कोपरगाव शहराच्या सुखशांती नगरमधील संरक्षक भिंतीच्या कामाचे अनधिकृत भूमिपूजन सत्ताधारी कोल्हे गटाला आणि कोपरगाव नगरपालिका प्रशासनाला चांगलेच महागात पडले आहे. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार करून निवेदन दिल्यानंतर कोपरगाव नगरपालिका प्रशासनाने कारवाई करून सदरच्या अनधिकृत भूमिपूजनाचा फलक हटविल्यामुळे सत्ताधारी कोल्हे गटावर नामुष्की ओढवली आहे. त्याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक राहुल शिरसाठ यांनी सत्तेचा गैरवापर करून आयत्या पिठावर रेघा ओढून कुणाच्या हौसेसाठी अनधिकृत भूमिपूजनं करू नका असे खडे बोल सत्ताधारी कोल्हे गटाला सुनावले आहे.

कोपरगाव शहरातील प्र.क्र.०२ मधील सुख-शांती नगर मध्ये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजने अंतर्गत ओपन स्पेसच्या संरक्षक भिंतींच्या बांधकामासाठी आमदार आशुतोष काळेंच्या पाठपुराव्यातून जवळपास २२ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. कोपरगाव नगरपरिषदेची निवडणूक होवून दोन महिने झाले असून एकही बैठक व्यवस्थित पार पडलेली नाही.आ.आशुतोष काळे यांनी कोपरगावकरांचे विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी कोट्यावधींचा निधी आणला आहे. त्यांच्या कामाचे श्रेय घेऊन सत्ताधारी कोल्हे गटाने आपल्या नेत्याला खूष करण्यासाठी राजशिष्टाचार न पाळता परस्पर मोजक्याच नगरसेवकांच्या व काही नगरपरिषदेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या कामाचे भूमिपूजन केले ते देखील दि.१५ रोजी रविवारी सुट्टीच्या दिवशी. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवकांनी आपला रोष व्यक्त करून कोपरगाव नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी पापडीवाल यांना निवेदन दिले.

या भूमिपूजनाचा फलक काढण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक राहुल शिरसाठ यांनी मागणी केली असता नगरपालिका प्रशासनाला सदरचा फलक हटविण्याची नामुष्की ओढवली आहे.

> **सत्ता असो व नसो विकासकामांना आम्ही कधीच विरोध केला नाही आणि करणार पण नाही कारण आमचे नेते आमदार आशुतोष काळे यांची विकासासोबत उभं राहण्याची आम्हाला शिकवण आहे. मात्र कोणत्याही कामाचे भूमिपूजन करतांना नगराध्यक्ष आणि नगरपालिका प्रशासनाने नगरसेवकांना विश्वासात घ्यावे. आम्ही प्रत्येक विकास कामात तुमच्या सोबत राहू.**
>
> **- शैलेश साबळे**
>
> **(कार्यकर्ते राष्ट्रवादी)**

# बनावट प्रमाणपत्रांद्वारे योजनेचा लाभ घेणाऱ्यांवर कारवाई होणार का?

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येत असल्याची चर्चा रंगली आहे. खऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांच्या हक्कांवर डल्ला मारून काही जणांनी शासनाच्या तिजोरीवर हात साफ केल्याचा आरोप होत आहे.

श्रीगोंदा तालुक्यात बनावट दिव्यांग प्रमाणपत्राचे मोठ्या प्रमाणात झाला असून यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय अथवा निमशासकीय ठिकाणी बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे अनेकांनी नोकरी मिळाली असून यामध्ये मूळ दिव्यांग वंचित राहिले आहेत बनावट दिव्यांग प्रमाणपत्र मिळविणारे नुसते नोकरीवरच नाही राहिले तर त्यांनी चक्क श्रीगोंद्यात समाज कल्याण विभाग तसेच इतर विभागाकडून मिळणाऱ्या विविध योजनांचाही लाभ मिळवला आहे त्यामुळे मूळ दिव्यांग उपाशी आणि बनावट दिव्यांग तुपाशी असल्याचे चित्र श्रीगोंद्यात पाहण्यास मिळत आहे खरे लाभार्थी वंचित आणि बनावट कागदांवर लाभ घेणारे मोकाट? राहणार का ? आता श्रीगोंद्यात आता एकच चर्चा कारवाई खरोखर होणार, की फाईलच्या कपाटातच दिव्यांग होणार? गावकऱ्यांची नजर प्रशासनाकडे. सत्य बाहेर येईल का? की पुन्हा एकदा शांततेचा पडदा? पडणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

**नेमका प्रकार काय ?** सूत्रांच्या माहितीनुसार, काही व्यक्तींनी वैद्यकीय तपासणीशिवाय किंवा बनावट कागदपत्रांच्या आधारे दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतल्याची शक्यता वर्तवली जात आहे.त्यामध्ये अपंगत्व निवृत्ती वेतन,शासकीय नोकरीतील आरक्षण,शैक्षणिक सवलती,घरकुल व इतर अनुदाने या योजनांचा लाभ खऱ्या गरजूंसाठी असताना, बनावट प्रमाणपत्रधारकांनी जागा व्यापल्याचा आरोप स्थानिक स्तरावर होत आहे.

**खरे दिव्यांग संतप्त :** खरे दिव्यांग लाभार्थी म्हणतात, आम्ही रांगेत उभे आणि कागदावरचे दिव्यांग पुढे?त्यांच्या मते, प्रशासनाने प्रमाणपत्रांची फेरतपासणी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**कारवाई होणार का?**

जिल्हा प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया नसली, तरी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. तज्ज्ञांच्या मते, सर्व प्रमाणपत्रांचे वैद्यकीय पुनर्मूल्यांकन लाभार्थ्यांची पडताळणी दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल अशी पावले उचलली तरच या गैरप्रकाराला आळा बसू शकतो.

**आता प्रशासनाची अग्निपरीक्षा**

दिव्यांग हक्क हा केवळ योजना नसून सामाजिक न्यायाचा विषय आहे. जर बनावट कागदांवर लाभ घेतला जात असेल, तर तो केवळ आर्थिक गुन्हा नाही तो नैतिक दिवाळखोरीचा नमुना आहे. त्यामुळे आता कारवाईसाठी प्रशासनाची अग्निपरीक्षा आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## यश माळवेची नासाच्या चंद्र मोहिमेसाठी निवड



**श्रीरामपूर :** अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासा यांच्या महत्त्वाकांक्षी आर्टेमिस २ चंद्र मोहिमेसाठी श्रीरामपूर येथील यश राजेश माळवे यांची निमंत्रित पाहुणे म्हणून निवड झाली. याबद्दल अशोक उद्योग समूहाचे सूत्रधार माजी आ.भानुदास मुरकुटे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. नासाच्या निमंत्रित पाहुणे कार्यक्रमांतर्गत यश माळवे यांना आर्टेमिस २ मोहिमेचे प्रवेशपत्र प्रदान करण्यात आले आहे. या मोहिमेद्वारे अवकाश प्रक्षेपण प्रणाली या शक्तीशाली प्रक्षेपण यंत्रणेच्या साहाय्याने ओरायन अंतराळयान मानवी अंतराळवीरांसह चंद्राभोवती भ्रमण करणार आहे. आर्टेमिस २ ही नासाची पहिली मानवी चंद्राभोवतीची मोहिम आहे. ही मोहीम भविष्यात राबविण्यात येणाऱ्या आर्टेमिस ३ चंद्रावर मानवी उतराई मोहिमसाठी महत्त्वाची ठरणार आहे. श्रीरामपूर सराफ राजेश माळवे यांचे ते सुपुत्र आहे. नासाच्या आर्टेमिस २ मोहिमेशी श्रीरामपूरचे नाव जोडले गेल्याने शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



# शिर्डीत गोमांस विक्री करणाऱ्यास बदडले

## गुन्हा दाखल



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** मोटार सायकल वर काळ्या पिशवीत पॅकिंग केलेल्या गोमांस विक्रीसाठी आलेल्या एका तरुणाला संतप्त जमावाने रंगेहाथ पकडले. या घटनेमुळे शिर्डी–साकुरी–शिव रस्त्यावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी आणि गोरक्षक दलाच्या कार्यकर्त्यांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

इम्रान इस्माईल शेख (४०, रा. ममदापूर, ता. राहाता) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त सर्वत्र भाविकांची गर्दी होती. त्याच वेळी इम्रान शेख हा दुचाकीवरून पार्सलमध्ये संशयास्पद मांस घेऊन शिर्डी–साकुरी–शिव रस्त्याने चालला होता. यावेळी काही जागरूक नागरिक व तरुणांना संशय आल्याने त्यांनी त्याला अडवले. त्याची तपासणी केली असता पार्सलमध्ये गोमांस असल्याचे आढळून आले. महाशिवरात्री दिवशीच हा प्रकार घडल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला. जमावाने त्याला चांगलेच बदडून काढत पोलीसांच्या हवाली केले .

या घटनेची माहिती मिळताच गोरक्षक दलाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कारवाई सुरू असतानाही हा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. वारंवार कारवाया होऊनही गोमांस विक्री थांबत नसल्याने पोलीस प्रशासनाने आता अधिक कठोर भूमिका घेण्याची मागणी होत आहे.

शिर्डी पोलिसांनी आरोपी इम्रान शेख रा ममदापूर (ता. राहाता) याच्या विरोधात प्राणी रक्षण सुधारणा कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डी पोलीस करत आहे.

## राहुरीत सहा. पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांची नियुक्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** येथे नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद भानुदास गीते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नुकतीच राहुरी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांची आश्वी येथे बदली झाल्याने राहुरी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या ठिकाणी नगर येथील विजय माळी यांची नियुक्ती करण्यात आली होती परंतु राहुरी पोलीस ठाण्यात विजय माळी हजर झाल्यानंतर त्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरू असल्याने त्यांच्यावर मागील सहा महिन्याच्या काळात सोनई पोलीस ठाणे हद्दीतील गंभीर स्वरूपाच्या गुन्हा वर प्रभावी व प्रतिबंधक कारवाई करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या मात्र त्या सूचनांचे पालन न झाल्याने यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.त्यांना अहिल्यानगर चे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी निलंबित केले असल्याचा १४ फेब्रुवारी रोजी आदेश जारी झाला होता.

विजय माळी हजर झाल्या झाल्याच त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने राहुरीत काल नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद भानुदास गीते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# विवेक कोल्हे यांचे राज्यसभेवर पुनर्वसनाचे संकेत



शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** राज्यसभेच्या लवकरच रिक्त होणाऱ्या सात जागाबाबत भाजपाकडून अद्याप उमेदवारी निश्चितीचे धोरण ठरले नसले तरी गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन युवक नेते विवेक कोल्हे यांना राज्यसभेवर पाठवून पुनर्वसन करण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह , केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे अत्यंत विश्वासू आणि लाडके समजले जाणारे विवेक कोल्हे यांना राज्यसभेवर घेत त्यांचे पुनर्वसन केले जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समजली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकारणातील बडे प्रस्थ म्हणून कोल्हे घराण्याला भारतीय जनता पक्षात विशेष असे वरचे स्थान आहे. माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या नंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी भाजपात प्रवेश केला.

गेल्या दहा वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा अंतर्गत कलहामुळे सौ कोल्हे यांना अवघ्या ८०० मतांनी पराभव पत्करावा लागला.

त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत विवेक कोल्हे यांनाच भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी निश्चित असताना भाजप आणि राष्ट्रवादी युतीमध्ये ही जागा आमदार आशुतोष काळे यांना सोडावी लागली.

कोपरगाव हा हक्काचा मतदार असताना देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांनी विवेक कोल्हे यांना दिलेल्या पुनर्वसनाच्या शब्दाखातर त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली नाही. आज किंवा उद्या होईल, असे करता करता वर्ष दोन वर्षे लोटले मात्र विवेक कोल्हे यांचे भाजपा श्रेष्ठींनी अद्यापही पुनर्वसन केले नाही.

विवेक कोल्हे यांना पदवीधर शिक्षक मतदार संघातून निवडून जाण्याची मोठी संधी उपलब्ध असताना देखील भाजपा श्रेष्ठींनी शब्द पाळला नाही. यानंतर विवेक कोल्हे यांनी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना व संजीवनी ग्रुपच्या माध्यमातून देशातील पहिला सहकारी सी.एन.जी प्रकल्प व स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रेन्युएल प्रकल्पाच्या उद्घाटनासाठी केंद्र आणि राज्यातील बड्या नेत्यांना थेट कोपरगावात आणून राजकीय शक्तीचे विराट असे शक्ती प्रदर्शन केले होते.

याच कार्यक्रमात अमित शाह यांच्याबरोबरच स्व. अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी विवेक कोल्हे यांच्या जे मनात आहे, ती इच्छा लवकरच पूर्ण होईल. असे लाखो लोकांसमोर जाहीर वचन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यावर कोणतीही सबब न दाखविता हे वचन पूर्ण करण्याची जबाबदारी या निमित्ताने येऊन ठेपली आहे. एप्रिल मध्ये राज्यसभेच्या सात जागा रिक्त होत आहेत. त्यासाठी विवेक कोल्हे यांचा पहिला हक्क असून कोल्हेंच्या राजकीय पुनर्वसनासाठी यापेक्षा दुसरी वेळ आणि संधी कोणतीच नाही.

## वृद्धाच्या डोक्यात वार करून खून

### निंबळक शिवारातील घटना ; परिसरात भीतीचे वातावरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील निंबळक शिवारात ७५ वर्षीय वृद्धाचा अज्ञात व्यक्तीकडून डोक्यात वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बापु नामदेव शिंदे (रा. मनोरमा कॉलनी, साईनाथनगर, अरुण हॉटेल मागे, नवनागापूर) असे खून झालेल्या वृद्धाचे नाव आहे. या प्रकरणी त्यांचे नातेवाईक मोहन बापु शिंदे यांनी रविवारी (१५ फेब्रुवारी) पहाटे फिर्याद दिली असून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) दुपारी २ वाजल्यापासून ते शनिवारी (१४ फेब्रुवारी) रात्री १०.४१ या कालावधीत घडली असावी. निंबळक गावच्या शिवारातील साईबन समोरील मोकळ्या पटांगणात, विळद बायपासजवळ ही रक्तरंजित घटना घडली. अज्ञात आरोपीने कोणत्यातरी कठीण वस्तूने बापु शिंदे यांच्या डोक्यात जोरदार वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या जखमांमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक एम. बी. चौधरी यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन तसेच स्थानिक नागरिकांची चौकशी सुरू आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. दरम्यान, नगर जिल्ह्यात सलग खून, गोळीबार आणि गुन्हेगारीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई करून गुन्हेगारांवर लगाम घालावा, अशी मागणी होत आहे.

## रेल्वेखाली अज्ञात इसमाची आत्महत्या

**श्रीरामपूर :** शहरातील सूतगिरणी रोडवर असलेल्या रेल्वे ट्रॅक परिसरात एका अज्ञात इसमाने आत्महत्या केली आहे. काल सोमवारी सकाळी १० च्या सुमारास ही घटना घडली. काल सकाळी शहरातील सूतगिरणी रोडवर असलेल्या रेल्वे ट्रॅक परिसरात एक इसम त्याच्या हातात असणाऱ्या बॅगसह चकरा मारत होता. तेव्हा त्या परिसरात पाणी भरणाऱ्या महिलांनी या इसमाला पाहीले. सदर इसम हा ट्रॅकच्या जवळ चकरा मारत असल्याचे आढळून आले. त्यानंतर या महिला पाणी भरून झाल्याने त्या महिला निघून गेल्या. त्याच्या काही थोड्या वेळाने एक मालगाडी त्या ठिकाणाहून गेली तेव्हा या गाडीखाली सदर इसमाने आत्महत्या केल्याचे आढळून आले.



## शिर्डीचे प्रसादालय ऑस्ट्रेलियाच्या साई भक्तांना भावले, ४० ऑस्ट्रेलियन साई दरबारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** ऑस्ट्रेलियातील ४० साई भक्तांनी काल शिर्डी येथे भेट देत साई प्रसादाच्या जेवणाचा मनःपूर्वक आनंद लुटला त्यांनी साईप्रसादालयास सदिच्छा भेट देऊन प्रसादालयाच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती जाणून घेतली. या भक्तांनी प्रसादालयातील स्वच्छता, शिस्तबद्ध नियोजन, तसेच अत्याधुनिक यंत्रणेद्वारे अल्पावधीत हजारो भाविकांना दिल्या जाणाऱ्या महाप्रसाद सेवेबद्दल विशेष समाधान व्यक्त केले आहे.

या सर्व साईभक्तांनी भेटीदरम्यान प्रसादालयाची दैनंदिन कार्यप्रणाली, अन्नधान्य साठवण व्यवस्था, स्वयंपाकातील गुणवत्ता नियंत्रण, तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती करून घेतली. मोठ्या प्रमाणावर भाविकांना विनामूल्य व गुणवत्तापूर्ण महाप्रसाद देण्याची सेवा ही केवळ व्यवस्थापन कौशल्याची नव्हे तर श्री साईबाबांच्या कृपाशिर्वादाची अनुभूती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भक्तांनी प्रसादालयातील स्वच्छता, अन्नाची चव, तसेच सर्व कर्मचारी यांची असणारी सेवाभावना यांचे कौतुक करत ही सेवा जागतिक स्तरावर आदर्शवत असून साईभक्तांसाठी प्रेरणादायी आहे, अशा उत्स्फुर्त प्रतिक्रिया नोंदवल्या.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक, गुन्हा

**श्रीरामपूर :** महिलेची नवऱ्याशी झालेल्या फारकतीचा फायदा घेऊन लग्नाचे आमिष दाखवत शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडून महिलेची फसवणूक केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील एका शाळेत शेती मोलमजुरीचे काम करणाऱ्या महिलेशी शहरातील वॉर्ड न. ७, उत्सव मंगल कार्यालयाजवळ राहणाऱ्या महेश लहू कोल्हे याने तिच्याशी ओळख करून जवळीक साधली. या महिलेच्या नवऱ्याने तिला फारकत दिली असून त्याचा गैरफायदा घेत लग्नाचे आमिष दाखवत स्वभावाचा गैरफायदा घेत शरीर संबंधाची मागणी केली. त्याने त्या महिलेला श्रीरामपूर, बाभळेश्वर, अकोले, मोहटा, पाथर्डी अशा विविध ठिकाणी लॉजवर नेऊन तिच्याबरोबर शारीरिक संबंध करून फसवणूक केली.

याप्रकरणी पीडित महिलेने श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी महेश लहू कोल्हे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टेम्पो पकडला; ३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**श्रीरामपूर :** तालुक्यातील भामठाण येथील गोदावरी नदीजवळ, महादेव मंदिराजवळ विनापरवाना वाळूची चोरी करून वाहतूक करणाऱ्या एका टेम्पोवर तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत विना क्रमांकाचा टाटा ७०९ टेम्पो आणि त्यातील दोन ब्रास शासकीय वाळू असा एकूण ३ लाख ६५ हजाराचा रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील भामठाण येथील गोदावरी नदीजवळ, महादेव मंदिराजवळ भामठाण येथील ज्ञानेश्वर बनसोडे हा विना क्रमांकाच्या विटकरी रंगाच्या टाटा ७०९ मॉडेलच्या टेम्पोमध्ये बेकायदेशीररित्या वाळू भरून, तिची विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असताना मिळून आला. पोलिसांनी त्याचेकडून विना क्रमांकाचा टाटा ७०९ टेम्पो आणि त्यातील दोन ब्रास शासकीय वाळू असा एकूण ३ लाख ६५ हजाराचा रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलीस नाईक अमोल जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२), ३(५), ३,१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल शेख करत आहेत.

# नगरपालिकेच्या जेसीबीने कत्तलखाने केले जमीनदोस्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** संगमनेर शहरातील जमजम कॉलनी व परिसरात येऊन धडकले.आणि एकामागे एक कत्तलखाने उद्ध्वस्त केले. शहरात१४ बेकायदेशीर कत्तल खाने सुरू आहेत त्यातील ८ ते ९ कत्तलखाने सायंकाळपर्यंत उध्वस्त करण्यात आले . पोलिस आणि नगर पालिका प्रशासनाने कत्तलखान्यावर धडक कारवाई केल्याने कत्तलखाना चालकांमध्ये एकाच खळबळ उडाली आहे.

संगमनेर शहरात अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर कत्तल खाने सुरू होते या कत्तल खाण्यातून दररोज शेकडो जनावरांची कत्तल करून हजारो टन गोमास मुंबई, ठाणे हैदराबाद या ठिकाणी पाठविले जाते या व्यवसायातून लाखो रुपयांची दररोज उलाढाल होत आहे. मोठ्या प्रमाणावर पैसे मिळत असल्याने अनेकजण या व्यवसायात सहभागी झाले आहेत.शहरातील कोल्हेवाडी रोड जमजम कॉलनी जोर्वे रोड या भागात विशेषता हे कत्तलखाने सुरू आहेत.शहरा बेकायदेशीरपणे सुरू असणारे कत्तलखाने बंद करावे या मागणीसाठी शहरातील हिंदुत्ववादी संघटनांनी वेळोवेळी आंदोलने केली होती. पोलीस प्रशासनाकडून थातूर मातूर कारवाई केली जात होती त्या मुळे



कत्तलखाने सुरळीतपणे चालू होते. मात्र हे कत्तलखाने तात्काळ उत्वस्त करा असे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी दिल्यानंतर आज सोमवारी नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून बेकायदेशीर चालणारे कत्तलखाने उध्वस्त केले आहे.

संगमनेर शहरातील कत्तलखाने उध्वस्त करण्यासाठी आमदार अमोल खताळ यांनी प्रथमपासूनच आक्रमक भूमिका घेतलेली होती. शहरातील सर्व कत्तलखाने उध्वस्त करा. त्यांनी शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेऊन तात्काळ सर्व बेकायदेशीर चालणारे कत्तलखाने उध्वस्त करा असे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी मागील आठवड्यात पोलिस व नगरपालिका प्रशासनाची बैठक घेऊन दिले होते. त्यानंतर नगरपालिकाव प्रशासन चांगलेच खडबडून जागे झाले होते. नगर पालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व कत्तलखानाचालकांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. या नोटीसी येऊनही कत्तलखाने बंद करण्यात आले नव्हते. यामुळे आज सोमवारी सकाळी पालिका प्रशासनाने धडक कारवाई करीत शहरातील बेकायदेशीर कत्तलखाने उद्धवस्त केले.